# पंचकर्म

AyuGranth – Dr. Prashant S. Chivate
*Learn Easily*
(Questions 8)

## Contents


पंचकर्म....1
पंचकर्म प्रस्तावना....2
अर्ह – अनर्ह....3
स्नेहन....7
स्वेदन....12
वमन व विरेचन....15
संसर्जन क्रम....21
बस्ति –....24
नस्य....34
रक्तमोक्षण....36
इतर चिकित्साकर्म....36
कर्णपूरण....36
धूमपान....37
मूर्ध्नि तैल....38
लंघन / उपवास....39
पंचकर्म सम्यक योग, अयोग, अतियोग लक्षणे....40
पंचकर्म व्यापद....42
स्नेह व्यापद....42
वमन – विरेचन व्यापद....42
बस्तिव्यापद....45
पंचकर्म कल्प....48
चरक कल्पस्थान....49

# पंचकर्म प्रस्तावना

- चरक संहितामध्ये पंचकर्म या शब्दाचा उल्लेख सर्वप्रथम सूत्रस्थान अध्याय 2 मध्ये आला आहे – पंचकर्माणि कुर्वीत मात्राकालौ विचारयन्
- चरकाचार्यांनी पंचकर्मचे विस्तृत वर्णन सिद्धिस्थानमध्ये केले आहे.
- **सिध्दिस्थान निरुक्ति** - सिध्देः अभिधायकं स्थानम् |

- **पंचकर्ममधील प्रयोज्य कर्म**

| | **चरक / सुश्रुत / भा.प्र / शारंगधर** | **डल्हण** | **वाग्भट** |
|---|---|---|---|
| 1) | वमन | वमन | वमन |
| 2) | विरेचन | विरेचन | कायविरेचन |
| 3) | अनुवासन बस्ति | बस्ति | निरुह बस्ति |
| 4) | निरुह बस्ति | नस्य | शिरोविरेचन |
| 5) | नस्य | रक्तमोक्षण | रक्तमोक्षण |

- बस्ति चिकित्साला अर्धचिकित्सा म्हणले आहे. - च.सि. 1/40

- **परिभाषा**
  1) **वमन** –
     - तत्र दोषहरणं उर्ध्वभागं वमन संज्ञकम् | (च.क 1)
     - अपक्वपित्तश्लेष्मणौ बलाद् ऊर्ध्वं नयेत् तु यत् | वमनं तद्धि विज्ञेयं मदनस्य फलं यथा || – शारंगधर
  2) **विरेचन** – अधोभागं विरेचन संज्ञकम्, उभयं व शरीरमलं विरेचनाद् विरेचन संज्ञा लभते | (च.क 1)
  3) **बस्ति** –
     - बस्तिना दीयते इति बस्ति | (च.क 1)
     - बस्तिर्भिर्दीयते यस्मात् तस्मात् बस्तिरीति स्मृत: | (शारंगधर)
  4) **नस्य** –
     - नस्यं तत् कथ्यते धीरैर्नासाग्राह्यं यदौषधम् | (च.क 1)
     - नस्त: कर्म च कुर्वीत शिरोरोगेषु शास्त्रवित् | (च.सि 9)
  5) **रक्तमोक्षण** – शरीरातील एका भागातून दूषित रक्त बाहेर काढणे.

- **सुश्रुत संहिता अनुसार दोष चिकित्सा** - (सु.सू. 33)
  - दोषा क्षीणा बृंहयितव्याः, कुपिताः प्रशमयितव्याः, वृद्धा निर्हर्तव्याः, समाः परिपाल्या इति सिद्धान्तः ||

- **पंचकर्म प्रयोजन**
  - चरक – दोषाः कदाचित्कुप्यन्ति जिता लंघनपाचनैः | जिताः संशोधनैर्ये तु न तेषां पुनरुद्भवः || (च.सु 16) / (अ.हृ.सू 4)

- शारंगधर – वमन, विरेचन आणि रक्तमोक्षणच्या संदर्भात 13½ पल (54 तोला ) म्हणजे 1 प्रस्थ असतो.

- **बहुदोष लक्षण**
  अविपाकोऽरुचिः स्थौल्यं पाण्डुता गौरवं क्लमः | पिडकाकोठकण्डूनां सम्भवोऽरतिरेव च ||
  आलस्यश्रमदौर्बल्यं दौर्गन्ध्यमवसादकः | श्लेष्मपित्तसमुत्क्लेशो निद्रानाशोऽतिनिद्रता ||
  तन्द्रा क्लैब्यमबुद्धित्वमशस्तस्वप्नदर्शनम् | बलवर्णप्रणाशश्च तृप्यतो बृंहणैरपि|| बहुदोषस्य लिङ्गानि तस्मै संशोधनं हितम् |- च.सू 16

- **शोधन लाभ**
  - तथा स लभते शर्म (सुख) सर्वपावकपाटवम् | धीवर्णेन्द्रियवैपुल्यं वृषतां दैर्घ्यमायुषः || - अ.हृ.सू. 4
  - कायाग्निरभिवर्धते, प्रकृतिश्चानुवर्तते, इन्द्रियाणि मनोबुद्धिवर्णश्चास्य प्रसीदति, वृषता चास्य जायते, जरां कृच्छ्रेण लभते चिरं जीवत्यनामयः | - च.सू 16
  - संशोधनाचा विभ्रंश – विषासमान, संशोधनाचा सम्यक योग – अमृतासमान असतो. – च.क 12

- **शोधन ऋतू** (च.सि 6)
  - वात दोष → प्रावृट = शुचि = आषाढ / नभ = श्रावण
  - पित्त दोष → शरद = उर्ज = कार्तिक / सह = मार्गशीर्ष
  - कफ दोष → वसंत = तपस्य = फाल्गुन / मधु = चैत्र
  - हे ऋतू विभाजन स्वस्थ व्यक्तिच्या संशोधनासाठी दिले आहेत.

- **स्नेहन, स्वेदन आणि शोधनच्या लाभाचे उदाहरण** – च.सि 6
  - स्नेहन - स्निग्धाद् पात्राद यथा तोयमयत्नेन प्रणुद्यते | (जसे गुळगुळीत भांड्यातून पाणी प्रयत्नाशिवाय (सहजपणे) बाहेर ढकलले जाते.)
  - स्वेदन - आर्द्रं काष्ठं यथा वन्हि: विष्यन्दयति सर्वतः | (जसे ओल्या लाकडाला अग्नी दिल्यावर सर्व बाजूंनी पाणी पाझरते.)
  - शोधन - स्नेहन शोधन द्वारा उत्क्लेशित दोष नष्ट होतात, जसे क्लिष्टं वासो संशोध्यते अम्भसा | (जसे घाणेरडे वस्त्र पाण्याने स्वच्छ केले जाते.)

- **योग्य वय**

| **चिकित्सा कर्म** | **अष्टांग संग्रह / अष्टांग हृदय** | **शारंगधर** |
|---|---|---|
| प्रतिमर्श नस्य | जन्मापासून मृत्युपर्यंत | जन्मापासून |
| मर्श नस्य | 7 - 80 वर्षे | 8 – 80 वर्षे |
| धूमपान | 18 + वर्षे | 12 - 80 वर्षे |
| कवल / गण्डुष | 5 + वर्षे | 5+ वर्षे |
| वमन | 10 - 70 वर्षे | जन्मापासून |
| विरेचन | | 16+ वर्षे |
| अंजन, लेप, स्नान, अभ्यंग | | जन्मापासून |

# अर्ह – अनर्ह

- **सर्व पंचकर्म अनर्ह**

- चण्डः साहसिको भीरुः कृतघ्नो व्यग्र एव च | सद्राजभिषजां द्वेष्टा तद्विष्टः शोकपीडितः ||
  यादृच्छिको मुमूर्षुश्च विहीनः करणैश्च यः | वैरी वैद्यविदग्धश्च श्रद्धाहीनः सुशङ्कितः ||
  भिषजामविधेयश्च नोपक्रम्या भिषग्विदा | एतानुपचरन् वैद्यो बहून् दोषानवाप्नुयात् ||
  एभ्योऽन्ये समुपक्रम्या नराः सर्वैरुपक्रमैः | अवस्थां प्रविभज्यैषां वर्ज्यं कार्यं च वक्ष्यते || - च.सि 2
- क्षीणक्षतदुर्बलमुर्च्छित कृशशुक्कदेहानाम्, दोषनिबद्धात् आयु (ज्याची आयु दोषांवर निर्भर आहे.) – च.सि 10

| **कर्म** | **Ref** | **अर्ह** | **अनर्ह** |
|---|---|---|---|
| **स्नेहन** | चरक | ✓ स्वेद्या: शोधयिताव्याश्च रूक्षा वातविकारिण: \| व्यायाममद्य स्त्रीनित्या: स्नेहया: स्युर्ये च चिन्तक: \|\|<br>✓ रूक्षाशना: कर्मनित्या **दीप्तपावका**: \| - च.क 12 | x अभिष्यण्णाननगुदा, उत्सन्न कफमेद, मंदाग्नि, दुर्बल, क्षीण<br>x **गर्भिणी**, **तालुशोष**, **तृष्णा**, मूर्च्छा, नस्य व बस्ति दिल्यापश्चात्<br>x उरुस्तम्भ, आमवात, अन्नद्वेषी, उदर, आम, विषाक्त, प्रतान्त मदातुर<br>x **कुष्ठ, शोथ, प्रमेह** निषेध आहे. तरीही यामध्ये स्नेहन करायचे झाल्यास त्यात क्रमशः **पिप्पली, हरीतकी आणि त्रिफला** सिद्ध स्नेह वापरावे. |
| | सुश्रुत | ✓ ग्रथित पुरीष, उरोविदाह, कोष्ठ वायू उर्ध्व गमन, दुर्बल, दुर्वर्णो | x तरुणज्वर, दुर्बल, अरोचक, स्थूल, मूर्च्छा, छर्दि, पिपासा<br>x बस्तिवमनविरेचन पश्चात,<br>x मद्यपी, अकाले दुर्दिन, अकालेच प्रसूता |
| | अ.हृ | ✓ वृद्धबालाबलकृशा रूक्षा:, क्षीणरेतस, वातार्त, **तिमिर**, दारूण, **प्रतिबोधिन** (झोपेतून उठण्यात कष्ट) | x उरूस्तभ, अतिसार, आम, **गलरोग**, **गरविष**, उदर, अपप्रसूता |
| **स्वेदन** | चरक | ✓ प्रतिश्याय, कास, श्वास, हिक्का, स्वरभेद,<br>✓ शिर:शूल, जानूग्रह, गृधसी, स्तम्भ, संकोच, खल्ली, वातकण्टक आदि वातकफज विकार<br>✓ आमदोष, शीतदोष, विबंध, आनाह<br>✓ **मुत्राघात, मूत्रकृच्छ्र** | x पित्तविकार, रक्तविकार, **वातरक्त**, क्षार, अग्निदग्ध, विषार्त<br>x कामला, प्रमेह, मधुमेह, अतिसार, उदररोग, गुदपाक, गुदभ्रंश, तिमिर<br>x गर्भिणी, कषायमद्यनित्यांना<br>**x नष्टसंज्ञा** |
| | सुश्रुत | ✓ पूर्वस्वेदन – नस्य, बस्ति, शोधन<br>✓ पश्चात् स्वेदन – मूढ़गर्भ अनुपद्रवा, सम्यक प्रजाता काले, शल्यहरण<br>✓ पूर्व व पश्चात् स्वेदन – भगंदर, अर्श, अश्मरी | x पाण्डु, मेह, क्षय, रक्तपित्त, अजीर्ण, उदर, छर्दी, अतिसार<br>x क्षाम, गर्भिणी, मद्यपान |
| | अ.हृ | ✓ अर्बुद, शुक्राघात, **आढ्यवात**, पक्षाघात आदि | x अतिस्थूल, क्षाम, **आढ्यरोगी**, तिमिर, कुष्ठ, विसर्प, पाण्डु, गर्भिणी, **क्षीरदधिस्नेहप्राशन पश्चात्** |

| कर्म | Ref | ✓ अर्ह | x अनर्ह व दिल्यास होणारे परिणाम |
|---|---|---|---|
| वमन | चरक | ✓ अयोग्य व्यतिरिक्त सर्व योग्य,<br>✓ कुष्ठ, नवज्वर, प्रमेह, श्लीपद,<br>✓ विष, गर्, अधोग रक्तपित्त,<br>✓ अतिसार, शोफ, पाण्डुरोग, विसूचिका, अलसक, दुष्टस्तन्य<br>✓ राजयक्ष्मा, अपस्मार, उन्माद, **मुखपाक** आदि | x क्षतक्षीण → रक्ताति प्रवृत्ति<br>x क्षीणाति स्थूलकृश बालवृद्धदुर्बल श्रान्तपिपासितक्षुधितानां → औषध बल असहत्वात् प्राणोपरोधः<br>x कर्म भाराध्व हत, उपवास, मैथुन, अध्ययन, व्यायाम, चित्त प्रसक्त क्षाम → रूक्षता, वातरक्त, उरःक्षत<br>x गर्भिणी → गर्भव्यापद, आमगर्भभ्रंश, दारूण रोगोत्पत्ति<br>x सुकुमार → हृदयकर्षण, अधो-उर्ध्व रक्तप्रवृति<br>x संवृत्त कोष्ठ, दुच्छर्दन प्रवाहण → विसर्प, स्तंभ, जाड्य, वैचित्य, मरणं<br>x उर्ध्वग रक्तपित्त, प्रसक्त छर्दि → **उदान** वायु हा प्राण नष्ट करुन रक्ताची अतिप्रवृत्ति करतो.<br>x उर्ध्ववातमध्ये अनुवासन, आस्थापन पश्चात् → उर्ध्व वात अतिप्रवृत्ति<br>x हृद्रोगी → हृदयोपरोध<br>x उदावर्त → घोरवत (भयंकर) उदावर्त **शीघ्रतरहन्ता**<br>x मूत्राघातदि → तीव्रतर शुलप्रादुर्भाव<br>x तिमिर → तिमिर वृद्धि<br>• उपरोक्त व्याधिमध्ये आवश्यकता पडल्यास विशेष रुपाने वमन देवू शकतो. जसे - विषपान, गरविष, विरुध्दं भोजन, अजीर्णं भोजन याने उत्पन्न झाल्यावर वमन निषेध नाही. |
| | सुश्रुत | ✓ | x तिमिर, उर्ध्ववात, स्थूल, केवलवातरोग, अध्ययन, प्रसक्त क्रूरकोष्ठी, उदावर्त, निरुहित आदि<br>x वमन अयोग्यमध्ये वमनचे विशेष निर्देश - अजीर्ण, विष विकार, अत्याधिक कफ वृद्धिमध्ये यष्टिमधु क्वाथाने वमन करावे.<br>x अवाम्यमध्ये वमन केल्यास → रोग कृच्छ्रसाध्य किंवा असाध्य होतो. (सु.चि 33) |
| | शा.सं | ✓ | x मंदाग्नि, भ्रम, विदारिका, **अपची**, उन्माद, अपस्मार, ज्वर, रक्तातिसार, कर्णस्राव, **द्विजिव्हिका** (उपजिव्हिका, अधिजिव्हा) |
| विरेचन | चरक | ✓ कुष्ठ, ज्वर, प्रमेह, उर्ध्वग रक्तपित्त,<br>✓ भगन्दर, अर्श, **ब्रध्न, मूत्राघात**<br>✓ श्वास, कास, पाण्डु, कामला<br>✓ अपस्मार, उन्माद, वातरक्त<br>✓ योनिदोष, वीर्यविकार<br>✓ विसर्प, पीडका, शोफ<br>✓ अभिघात, विषार्त, नातिस्निग्ध आदि | x सुभग → सुकुमारमध्ये वमन केल्याने होणारे दोष<br>x क्षतगुद → **प्राणोपरोधकरीं रुजां** जनयेत्<br>**x** मुक्तनाल → **अतिमल प्रवृत्तिने मृत्यु**<br>x अधोग रक्तपित्त → अतिप्रवृत्तिने मृत्यु<br>x विलंघित, दुर्बल इंद्रिय, अल्पाग्नि, निरुढ → औषधवेग सहन होत नाही.<br>x कामादिमध्ये व्यग्र मन → न प्रवर्तते, कृच्छेन वा प्रवर्तमानम्, अयोग् दोषान् कुर्यात्<br>x अजीर्ण → आमदोष<br>x नवज्वर → वात दोष प्रकोप<br>**x** मदात्यय → क्षीण देहं वायु **प्राणोपरोधं** कुर्यात<br>x आध्मान → आनाह, मृत्युकारक<br>x शल्यार्दित → क्षतस्थानमध्ये वायु कुपित होवून मृत्यु<br>x अतिस्निग्ध → अतियोगजन्य उपद्रव होवू शकतात.<br>x अतिरूक्ष → अंगप्रग्रह<br>x दारुण कोष्ठ → हृदयशूल, पर्वभेद, आनाह, अंगमर्द, छर्दि<br>x मूर्च्छा, क्लम → मृत्यु<br>x अतिक्रूर कोष्ठ |
| | सुश्रुत | ✓ विषाभिघात, पिडका, शोफ, पाण्डु, विसर्पिणः | x मंदाग्नि, स्थूल, नवप्रतिश्याय, मंदज्वर<br>x अविरेच्यमध्ये विरेचन केल्यास → मृत्यु (सु.चि 33) |

- **वमन विरेचन योग्य** - प्रमेह, कुष्ठ, उन्माद, अपस्मार, पाण्डू, शोथ, श्वास, कास, अलसक, विसूचिका, गलगण्ड, अर्श

| कर्म | Ref | ✓ अर्ह | x अनर्ह व दिल्यास होणारे परिणाम |
|---|---|---|---|
| निरुह | चरक | ✓ वात, प्लीहा, गुल्म, हृदयरोग, उन्माद, **ब्रध्न**, भगंदर, परिकर्तिका आदि | x अजीर्ण, अतिस्निग्ध, पीतस्नेह → दुष्योदर, मूर्च्छा, श्वयथु<br>x उत्क्लिष्ट दोष एवं अल्पाग्नि → **तीव्र अरोचक**<br>x यानक्लान्त (यात्रा करुन दमल्यावर) → देहशोष<br>x अतिकृश → कार्श्यम् पुनः जनयेत<br>x भुक्तभक्त, पीतोदक → वायु उत्क्लेशाने क्षीघ्र घोर विकार<br>x वमन, विरेचन → **क्षार क्षताने** जळल्याप्रमाणे दाह उत्पत्ति<br>x नस्यकर्म → इन्द्रियभ्रंश<br>x क्रोधि, भीत → **बस्ति उर्ध्वम् उपप्लवेत्**<br>x छर्दि, निष्ठीविका, श्वास, कास, हिक्का → बस्ति द्रव्य उर्ध्व मार्गाने येणे<br>x मदग्रस्त, मुर्च्छा → विचलित संज्ञा, चित्तोपघात<br>x बध्दोदर, छिद्रोदर, दकोदर, आध्मान → भृशम् आध्मानः, **प्राणान् हिस्यात्**<br>x अलसक, विसुचिका, आमप्रजाता, आमातिसार → आमदोष वृद्धि<br>x मधुमेह, कुष्ठी, क्षीणक्षत, शोष → व्याधेः पुनवृद्धिः<br>x न विशोधितानां येषां च दोषेषु निबध्दमायुः |
| अनुवासन | चरक | ✓ सर्व आस्थापन दिलेल्या व्यक्ति, विशेषतः तीक्ष्णाग्नि युक्त, रूक्ष शरीर, केवल वातरोगी<br>✓ प्रतिदिन अनुवासन योग्य - रूक्षनित्यस्तु दीप्ताग्नि व्यायामी मारूतामयी । वंक्षणश्रोणि प्रदेशी वात प्रकोप, उदावर्त पीडित – च.सि 4 | x अनास्थाप्य (आस्थापन बस्ति अयोग्य)<br>x अभुक्त → अनआवृत्तमार्गाने स्नेह उर्ध्वगामी<br>x नवज्वर, पाण्डुरोग, कामला, प्रमेह → उदररोग<br>x अर्श → आध्मान<br>x अरोचक → अन्न गृद्धि (अन्न सेवनेच्छा) नष्ट होणे<br>x मंदाग्नि → मन्दतर अग्नि<br>x प्रतिश्याय, प्लीहा → दोषवर्धन<br>x कृमिकोष्ठ, कुष्ठ, प्रमेह, मेदस्वी, संशोधन योग्य |
| | सुश्रुत | ✓ केवलन् वातपीडितम अहोरात्रं – सर्वेषु अनुवासयेत् | x उदर, प्रमेह, कुष्ठ, स्थौल्यमध्ये अनुवासन देवू नये. (निरुह देवू शकतो)<br>x श्वास, कास मध्ये निरुह – अनुवासन करू नये. |
| | शा.सं | ✓ तीक्ष्णाग्नि | x अजीर्ण, उन्माद, तृष्णा, भय, शोक, मूर्च्छा, अरुचि, श्वास, कास, क्षय – न आस्थापन न अनुवासन. |
| | अ.सं | ✓ | x पाण्डुरोगीमध्ये स्नेह बस्ति दिल्यास → उदर व्याधि निर्माण |

- **बृंहण बस्ति अयोग्य**
- चरक
  - x मेदस्वी, कुष्ठ, प्रमेह रोगी – च.सि 10

| कर्म | Ref | अर्ह | अनर्ह व दिल्यास होणारे परिणाम |
|---|---|---|---|
| शिरो विरेचन | चरक | ✓ उर्ध्वजत्रूगत परिपक्व वात विकार नष्ट होतात | x अजीर्ण, भुक्तभक्त (अधोभक्त) → उर्ध्वस्त्रोतस आवृत्त करुन कास, श्वास, वमन तथा प्रतिश्याय उत्पत्ति<br>x स्नेहपान, मद्यपान, जलपान → मुखनासास्राव, उपदेह, **तिमिर**, शिरोरोग आदि<br>x शिर स्नान अथवा नस्य पश्चाद् स्नान → **प्रतिश्यायात्**<br>x क्षुधार्त → वातप्रकोप<br>x तृष्णार्त → तृष्णावृद्धि, मुखशोष<br>x श्रमार्त, मद, मुर्च्छित → चित्तोपघात<br>x शस्त्रदण्डहत् → तीव्रतररुजा<br>x व्यवाय, व्यायाम, मद्यपान याने थकलेले → शिर, स्कन्ध, नेत्र, उर पीडा<br>x नवज्वर, शोकाभितप्त → **तिमिर**, ज्वरवृध्दि<br>x विरेचन (विरिक्त) → वायु द्वारे इन्द्रियोपघात<br>x अनुवासित → कफ प्रकोपाने शिरोगुरुत्व, कण्डु, कृमिदोष<br>x गर्भिणी **→ गर्भस्तम्भ, काण, कुणि, पक्षहत, पीठसर्पी बालक**<br>x नवप्रतिश्याय → स्त्रौतोव्यापद<br>x अनऋतौ (निषिध्द ऋतु), दुर्दिन → शीतदोषामुळे पूतिनस्य, शिरोरोग उत्पन्न |

- अजीर्ण – सर्व चिकित्साकर्म निषेध – वमन, विरेचन, बस्ति, नस्य, अंजन, गण्डुष, धूमपान

# पंचकर्म दृष्टांत (चरक)

- **वमन कर्म उदहारण**
  - उदा- केदारसेतु तुटणे. स्पष्टिकरण – चक्रपाणी टिका - वमन हे सर्व उपक्रमांपेक्षा कफामध्ये प्रधानतम आहे, असे वैद्य मानतात; कारण वमन अगदी सुरुवातीलाच आमाशयात प्रवेश करून केवळ वैकारिक कफ मूळापासून बाहेर काढते. त्या कफावर विजय मिळवल्यास, शरीरांतर्गत असलेले कफाचे विकारही शांत होतात, जसे - शेताचा (केदार) बंधारा (सेतू) फुटल्यावर पाण्याने भिजलेले शालि (भात), षष्टिकादी धान्ये वाळून जातात, त्याचप्रमाणे.

- **विरेचन कर्म उदहारण**
  - उदा. - अग्नि शान्त झाल्यावर अग्निगृह उपशमन (स्वयं शान्त) होतो. (जसे gas cylinder व शेगडी एकत्र लावून अग्नि तयार करतो. नंतर जेंव्हा gas cylinder रिकामा होतो तेंव्हा अग्नि आपोआप शांत होते. त्याच प्रमाणे उपरोक्त योग्य व्याधिमध्ये विरेचन केल्यावर दूषित पित्त निघून गेल्याने इतर सर्व पित्ताचे त्रास कमी होतात)

- **निरूह कर्म उदहारण**
  - उदा. - वनस्पतिमूलच्छेदवत्  (जसे वनस्पतिचे मुळ छेद केल्यावर वरील सर्व झाड मरुन जाते. त्याच प्रमाणे उपरोक्त अर्ह व्याधिमध्ये निरुह केल्यास विकृत वाताचे मुळापासून छेदन होते.)

- **अनुवासन कर्म उदहारण**
  - उदा. — अनुवासनं प्रधानतम् अमित्युक्तं मुले द्रुमप्रसेकवत्  (जसे झाडाच्या मुळाशी पाणी सोडल्यावर ते पाणी पूर्ण झाडाला प्राप्त होते तसे अनुवासन वरील व्याधिमध्ये केल्यावर संपूर्ण शरीरात पसरून स्निग्धता आणतो.)

- **शिरोविरेचन कर्म उदहारण**
  - उदा.- मुञ्जात् इषिकामिवासक्ता केवलं विकारकरं दोषम् अपकर्षति |
    (मुंज (एक गवत) याच्या शरा (भागा) मधून, ईषिका (काडी) अडकूनही, मुंजाला कोणतीही हानी न पोहोचवता ज्याप्रमाणे बाहेर काढली जाते, त्याचप्रमाणे डोक्यामध्ये (शिरसि) परिपक्व झालेला दोष (नस्याद्वारे) बाहेर काढला जातो.)
    (मुंज (Munja Grass): हे एक विशिष्ट प्रकारचे गवत आहे. याच्या खोडाचे आवरण किंवा बाह्यभाग (शरा/त्वचा) हा मजबूत असतो. ईषिका: मुंज गवताच्या आत एक मऊ आणि नाजूक काडी असते, जी खोडात (शरात) अडकलेली असते.
    निष्कासन प्रक्रिया: जेव्हा ही ईषिका आतून बाहेर काढली जाते, तेव्हा ती मुंजाच्या बाह्यभागाला (शराला) कोणतीही हानी न पोहोचवता हळूवारपणे आणि पूर्णपणे बाहेर येते. त्याच पद्धतीने शिरोविरेचन हे फक्त विकृत दोषाला बाहेर काढते, शिर प्रदेशी कोणताही धक्का न लावता.)

- **सुश्रुत**

- **वमन लाभ दृष्टांत** - छिन्ने तरौ पुष्पफलप्ररोहा यथा विनाशं सहसा व्रजन्ति  (सु.चि. 33)
- **विरेचन लाभ** – यथौदकानाम् उदकेऽपनीते चिरस्थिराणां भवति प्रणाशः | (सु.चि. 33)

# स्नेहन

**प्रस्तावना** -

- **सुश्रुत –** स्नेहसारोऽयं पुरुषः, प्राणाश्च स्नेहभूयिष्ठा, स्नेहमाध्याश्च (रक्षार्थ) भवन्ति

- **स्नेहन क्रियाचे लाभ** (च.सि 1)
  1. स्नेहो अनिलं हन्ति, 2. मृदु करोति देहं, 3. मल सङ्ग दूर करतो

## स्नेहाचे प्रकार

- **स्नेह योनि** – 2 –
  - स्थावर – तेल इ. (स्थावर स्नेह आशय = 18)
  - जांगम – घृत, वसा, मज्जा इ.

- **चतु:स्नेह विकल्प** –

- चरक - घृत, तेल, वसा, मज्जा (सर्वोत्तम – घृत – कारण घृत हे संस्काराने दुसऱ्या गुणांचे अनुवर्तन करतो)
- अ.हृ – सर्पि, मज्जा, वसा, तेल (Trick - समवते)
- घृत → मज्जा → वसा → तेल – उत्तरोत्तर वातकफ विकारांसाठी श्रेष्ठ
- तेल → वसा → मज्जा → घृत - उत्तरोत्तर पित्त विकारांसाठी श्रेष्ठ
- घृत → तेल → वसा → मेद → मज्जा – उत्तरोत्तर गुरु आणि वातशामक (सुश्रुत)
- घृत → तेल → वसा → मज्जा – उत्तरोत्तर गुरु

  - यमक स्नेह – कोणतेही 2 स्नेह एकत्र मिसळल्यावर जे मिश्रण तयार होते त्यास यमक म्हणतात.
  - त्रिवृत – कोणतेही 3 स्नेह एकत्र मिसळल्यावर जे मिश्रण तयार होते त्यास त्रिवृत म्हणतात.
  - महान् – सर्व चारही स्नेह एकत्र मिसळल्यावर जे मिश्रण तयार होते त्यास महान् म्हणतात.

- **स्नेह गुणधर्म व indication**

| **स्नेह** | **Ref** | **गुणधर्म** | **योग्य अवस्था** |
|---|---|---|---|
| घृत | च | घृतं पित्तानिलहरं रसशुक्रौजसां हितम् \|<br>निर्वापणं मृदुकरं स्वरवर्ण प्रसादनम् \|\| | वातपित्त प्रकृति, वातपित्तज रोग, क्षतक्षीण, दाह-शस्त्र-विष-अग्निहत, सौकुमार्य, बल-वर्ण-स्वर प्रसादन, चक्षु:कामा, आयु:प्रकर्ष कामा, पुष्टिकामा, प्रजाकामा, दीप्ती, ओज-स्मृति-मेधा-अग्नि-बुद्धि-इंद्रियबल वृद्धि |
| | सु | | रुक्षक्षत विषार्तानां वातपित्तविकाराणाम् हीनमेधास्मृतिनाम् |
| | वा | सहस्त्रवीर्य विधिभि: कर्मसहस्त्रकृत | धी स्मृतिमेधाधिकांक्षिणां |
| | का | **कफ न चिनोति** (कफ संचय नाही होत),<br>**योनि शोधक** | |
| तेल | च | मारुतघ्नं न च श्लेष्मवर्धनम् \|<br>त्वच्यं उष्णं स्थिरकरं तेलं **योनिविशोधनम्** \|\| | प्रवृद्ध श्लेष्ममेद, स्थूलगलोदरा, वातप्रकृति, वातव्याधि, कृमिकोष्ठ, क्रूरकोष्ठ, नाडीव्रण (शरीरात बल, तनुत्व, लघुता, दृढता वृद्धिसाठी) |
| | सु | | कृमिकोष्ठानिलावेष्ठा: प्रवृद्धकफमेदस: तेलसात्म्यश्च दार्ढ्यार्थिनश्च |
| | वा | संस्कारात् सर्वरोगजित् | ग्रंथिनाडीकृमिश्लेष्म मेदमारुत: लाघवं दार्ढ्यार्थिक्रूरकोष्ठी |
| | का | **स्वरवर्णकर, शरीर स्थैर्यकर, भग्नच्युत संधान, धातुव्रण शोधन** | |
| वसा | च | विद्धभग्नाहत **भ्रष्टयोनि** कर्णशिरोरुजि \|<br>पौरुषोपचये स्नेहे व्यायामे चेष्यते वसा \|\| | ***वातातपसहा***, रूक्षा, भारध्वकर्शिता, संशुष्क रेतोरुधिरा, कफमेदक्षया, महत अग्निबल, वसासात्म्य, अस्थि-संधि-सिरा-स्नायु-मर्मकोष्ठ महारुजः, स्त्रोतोवृत्त बलवान वायु |
| | सु | | **व्यायामकर्षित**, शुष्करेतोरक्ता, महारुजा, महाग्निमारुतप्राणा |
| | वा | | सन्ध्यस्थि मर्म कोष्ठ रुजा, दग्धाहत, भ्रष्टयोनि, कर्णशिरो रुजी |
| मज्जा | च | बलशुक्ररसश्लेष्ममेदोमज्जा विवर्धन: \|<br>मज्जा विशेषतोऽस्थ्नां च बलकृत स्नेहने हितं \|\| | दीप्ताग्नि, क्लेशसहा, घस्मरा, सदास्नेह सेविन:, वातार्ता, क्रूरकोष्ठ |
| | सु | | क्रूराशया, क्लेशसहा, वातार्ता, दीप्तवन्हि |
| | वा | | ***वातातपाध्वभार*** स्त्रीषु व्यायाम क्षीणधातु, रुक्ष, क्लेशक्षमा, अत्याग्नी, वातावृतपथेषु |

| | | | |
|---|---|---|---|
| | का | वसामज्जा – **प्रजाबलायु स्थिरकर** | |

- शारंगधर –
  - शुष्करेतस, शुष्करक्त – वसापान
  - महाग्नि – वसापान
  - दीप्ताग्नि – तेलपान
  - दीप्तवन्ही – मज्जापान

- **श्रेष्ठ –**
- स्थावर स्नेहात श्रेष्ठ – तेल
- जांगम स्नेहात श्रेष्ठ – गोघृत
- बलार्थे स्नेहने – तिल तेल
- विरेचानार्थ – एरण्ड तेल
- भल्लातक तथा तुवरक तेल – उभयतोदोषहर

- **स्नेह अनुपान व प्रयोज्य ऋतू**

| **स्नेह** | **अनुपान** | **प्रयोज्य ऋतू** | **अतिसेवन जन्य परिणाम (काश्यप)** |
|---|---|---|---|
| घृत | उष्ण जल | शरद | मूर्च्छा |
| तेल | युष | प्रावृट | विदाह |
| वसा | मण्ड | माधव (वसंत) | हृल्लास |
| मज्जा | मण्ड | माधव (वसंत) | गौरव |
| | | | **अतिस्नेह उपचार –** तक्र, मूत्र सेवन |

- काश्यप – घृताचे सेवन सर्व व्यक्ति सर्व ऋतूमध्ये करू शकतात.
- सामान्य अनुपान –
  - चरक - सर्व स्नेहपान पश्चात् उष्ण जल प्यावे. याने स्नेह सम्यक जीर्ण एवं स्नेहलिप्त मुखचे विशोधन होते.
  - अष्टांग हृदय – लाजा
  - काश्यप – उष्ण जल (लाभ – व्रणधातुमृदुकरण व दीपन)
- तुवरक तेल, भल्लातक तेल पान पश्चात् शीतल जलच प्यावे. उष्णजलपान निषिद्ध आहे.
- सुश्रुत – तेलपान पश्चात् अनुपान = युष, अम्ल, कांजी

- **अच्छपान** –
- केवल स्नेहपान
- प्रथम मुख्य कल्पना
- साम पित्तामध्ये केलव अच्छपानचा निषेध आहे. केल्यास – <u>देहं हत्वा संज्ञां च मारयेत्</u>
- योग्य अवस्था – सुश्रुत – स्नेहसात्म्य, क्लेशसह, नात्युष्णशीतल काल

- **स्नेह प्रविचारणा** –
- स्नेहाला भोज्य पदार्थांसोबत घेणे.
- उत्तम प्रविचारणा - यवकुलत्थानां रसा: क्षार सुरा दधि सर्पि तत्सिद्धं
- स्नेहप्रविचारणासाठी योग्य अवस्था –
  - स्नेहद्विषः स्नेहनित्या मृदुकोष्ठाश्च ये नराः | क्लेशसहा मद्यनित्यास्तेषामिष्टा विचारणा || -च.सू. 13

- चरक / अ.हृ = 24 प्रविचारणा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1) रस | 2) मांस | 3) दूध | 4) खण्ड | 5) भक्ष्य | 6) नस्य |
| 7) ओदन | 8) सूप | **9) दही** | 10) काम्बलिक | 11) अभ्यंजन | 12) गंडूष |
| 13) विलेपी | 14) शाक | **15) मद्य** | 16) तिलकल्क | 17) कर्णतेल | 18) बस्ति |
| 19) यवागू | 20) युष | 21) लेह | 22) सत्तू | 23) नेत्रतर्पण | 24) उत्तरबस्ति |

- काश्यप = 20

- **रसांच्या संयोगाने प्रविचारणा** –
- चरक / वाग्भट - रसांच्या संयोगाने 63 + 1 अच्छपान = 64
- सुश्रुतानुसार – रसभेद अनुसार स्नेहकल्पना = 63

- **सुश्रुतांनुसार स्नेहनाचे प्रयोगानुसार प्रकार** – सु.चि. 31 (स्नेहाध्याय)

1) अभ्यंतर स्नेहपान – सर्वोत्तम
2) अनुवासन
3) शिरोबस्ती
4) शिरोधारा
5) नस्य
6) कर्णपूरण
7) उत्तर बस्ती
8) अभ्यंग
9) विचारणा स्नेह

- **सुश्रुतांनुसार स्नेह कल्पना**

- विरेक - पलाश, कम्पिल्लक, विषाणिका आदि
- शिरोविरेचन - विडंग, सिद्धार्थक, खरमंजिरी (अपामार्ग)
- व्रणहर - करंज, पूतिक, कृतमाल, मातुंलुग, इंगुदी, किराततिक्त
- महाव्याधिहर - तुवरक, कपित्थ, कम्पिल्लक, भल्लातक, पटोल
- मुत्रसङ्गहर - त्रपुस, एर्वारूक, कर्कारूक, भल्लातक, कुष्माण्ड
- शर्कराअश्मरीहर – **कपोतवंग**, अवल्गुज, हरीतकी
- प्रमेहहर – कुसुम्भ, सर्षप, अतसी, पिचुमर्द (नीम), अतिमुक्तक (तिन्दुक), भाण्डी, कटुतुम्बी, कटभी
- पित्तवातहर – ताल, नारिकेल, पनस, मोच, प्रियाल, बिल्व, मधूक, श्लेष्मान्तक, आम्रातक
- कृष्णीकरण – बिभीतक, भल्लातक, पिण्डितक (मदनफल)
- पाण्डुकरण - श्रवण (गोरखमुण्डी), टुण्टुक
- दद्रुकुष्ठकिटीभहर - सरल, पीतदारु, शिंशपा, अगरू सारस्नेह
- वमन - जीमुतकादि

- **सद्य स्नेहन**

- चरक –
  - पांचप्रासृतिक पेया – घृत, तेल, वसा, मज्जा, तण्डुल – प्रत्येकी 1-1 प्रसृत – शीघ्र स्नेहन करते.
  - सलवण स्नेह – लवण मिश्रित सर्व स्नेह शीघ्रत्वेने स्नेहन करतात (कारण लवण – अभिष्यंदी, अरुक्ष, सूक्ष्म, उष्ण, व्यवायी)
- सुश्रुत – पिप्पली, लवण, चतुर्विध स्नेह, दधि, आणि मस्तु एकत्र करुन प्यावे.
- अ.हृ – 7 सद्य स्नेहन योग सांगितले आहेत.

- **अवस्थानुसार स्नेह**

- निराम पित्तज व्याधि – अच्छ घृतपान
- साम पित्तज व्याधि - अच्छ घृतपान निषेध
- वातज व्याधि – घृत + लवण
- कफजव्याधि – घृत + यवक्षार + त्रिकटु
- रुक्ष रुग्णासाठी – फाणितं शृंगबेरं च तैलं च सुरया सह तथा भूतैर्मासे सह
- वातप्रधान व्यक्तिमध्ये - तैलं सुराया मण्डेन वसां मज्जानमेव सफाणितमेवं क्षीर
- योनिशुक्रप्रदोषेषु – तैलमज्जावसासर्पिबदरत्रिफलारसै
- अकाल प्रसूता पश्चात् गर्भाशयेऽवशेषा – 10 दिवस पश्चात् स्नेहपान सुरु करावे.
- अज्ञात कोष्ठ – स्नेहाची <u>ऱ्हस्व मात्रा</u> द्यावी.

- **स्नेहन विशेष वर्णन**

  "नालं स्नेह <u>समृद्धस्य</u> शमायान्न सुगुर्वपि |" – च.सु. 13/72
  "नालं स्नेह <u>समिध्दस्य</u> शमायान्न सुगुर्वपि" – च.चि 15/202

- नालं = न अलं = Nothing better than
- स्नेहाने अग्निवृद्धि एवढी चांगली होते की सुगुरु (चांगलाच जड) अन्न ही पचन करते.

## स्नेहमात्रा

- **शारंगधर** – अग्निनुसार स्नेहमात्रा वर्णन

| मात्रा प्रकार | मात्रा | योग्य अग्नि | गुण |
|---|---|---|---|
| उत्तम | 4 कर्ष (1 पल) | दीप्ताग्नि | **कुष्ठ**, विष, उन्माद, ग्रह, अपस्मार नाशिनी |
| मध्यम | 3 कर्ष | मध्यम अग्नि | स्नेहनी, बृंहणी, **भ्रमहारिणी** |
| हीन | 2 कर्ष | हीन अग्नि | दीपन, वृष्य, स्वल्पदोषेषु |

- **चरक / अ.हृ / काश्यप–** पाचनकाल / जीर्णकालानुसार स्नेहमात्रा वर्णन

| स्नेहमात्रा | पाचन काल – अ.हृ | पाचन काल – चरक | रोग | अवस्था |
|---|---|---|---|---|
| उत्तम मात्रा | 8 याम | 1 अहोरात्र | सर्पदंष्ट्रा, विसर्प, उन्माद, विबंध, गुल्म, मूत्रकृच्छ्र | तीक्ष्णाग्नि, शरीरबल श्रेष्ठ, नित्यप्रभूतस्नेहसेवी, क्षुत्पिपासासहा नर: \| |
| मध्य मात्रा | 4 याम | 1 दिवस | क्षुद्रकुष्ठ, **कुष्ठ**, प्रमेह, वातरक्त, विचर्चिका | **मृदु कोष्ठ**, अग्निबल-शरीरबल मध्यम |
| ऱ्हस्व मात्रा | 2 याम | अर्ध दिवस | ज्वर, कास, अतिसार | मंदाग्नि, **रिक्तकोष्ठी**, बाल, वृद्ध, सुकुमार, अवर बल |
| ह्रसीयसी मात्रा | फक्त अष्टांग हृदय – स्नेह व कोष्ठ परीक्षणार्थ – अशी मात्रा जी 2 याम पेक्षाही कमी वेळात जीर्ण होते. | | | |

- **चरक**
  - प्रधान मात्रा –
    - दोषानुकर्षिणी मात्रा सर्वमार्गानुसारिणी | बल्या पुनर्नवकारी शरीरेन्द्रियचेतसाम् || (हे स्वत: शोधन करते.)
  - मध्यम मात्रा –
    - **मंदबिभ्रंशा**, न च अतिबलहारिणी, सुखेन च स्नेहयति, शोधनार्थ च युज्यते (हे स्नेहन करते. पश्चात् स्वतंत्र शोधन करावे लागते)
    - सुखपुर्वक स्नेहन एवं शोधनसाठी प्रयुक्त स्नेहाची मध्यम मात्रा
  - अल्प मात्रा
    - परिहारे सुखा, स्नेहन, बृंहण, वृष्या, बल्या, निराबाधं चिरा

- **अ.हृ – अवस्थानुसार मात्रा**
  - शोधनार्थ – प्रधान मात्रेत आहार जीर्ण झाल्यावर, क्षुधा लागण्यापूर्वीच स्नेहपान करावे.
  - शमनार्थ – मध्यम मात्रेत, क्षुधा लागल्यावर अन्न न घेता स्नेहपान करावे.
  - बृंहणार्थ – अल्प मात्रेत क्षुधा लागल्यावर मांसरस, मद्यपान सोबत स्नेहपान करावे.
    - प्रागभक्त स्नेहपान – अधोभाग दोषहर
    - मध्यभक्त स्नेहपान – मध्यभाग दोषहर
    - उत्तरभक्त स्नेहपान – उर्ध्वदेहभाग दोषहर

- **सुश्रुतांनुसार** – 5 काल

| काल | प्रहार | उपयोगिता |
|---|---|---|
| चतुर्थभागगते अहनि (प्रथममात्रा / प्रशस्त) | 1 प्रहर = 3 तास | दीपन, अल्पदोष |
| अर्द्ध दिवस गते | 2 प्रहर = 6 तास | वृष्या, बृंहणी, मध्यदोषे |
| चतुर्भागशेषिते अहं | 3 प्रहर = 9 तास | बहुदोष |
| अहनि | 4 प्रहर = 12 तास | ग्लानि, मूर्च्छा, मद (श्रेष्ठमात्रा) |
| अहोरात्राद् | 8 प्रहर = 24 तास | कुष्ठ, विष, उन्माद, ग्रह, अपस्मार |

- **अवस्थानुसार स्नेहपान काल**

| अवस्था | सेवनकाल | विपरीत कालमध्ये स्नेहपान केल्यास परिणाम |
|---|---|---|
| उष्णकाल, वातपित्ताधिक | रात्रि स्नेहपान | मूर्च्छा, पिपासा, उन्माद, कामला |
| शीतकाल, श्लेष्माधिक, वातकफाधिक | दिवा, अमलभास्कर | आनाह, अरुचि, शूलं, पाण्डुता |
| तेल | शीत काली तत्काल सेवन करावे | |
| उष्णकाली घृत, पित्त, पित्तवात, पित्तकफ, वात अधिक | रात्रि | पित्तजविकार |
| शीतकाली घृत | दिवा | वातकफजविकार |

## स्नेहपान

- **स्नेहपान पूर्वकर्म**
- आहार – द्रवं उष्णं न अभिष्यंदि, न संकीर्ण, मात्रावत भोजन
- स्नेहनपूर्व रुक्षण –
  - सुश्रुत - मांसल, मेदुर, भूरीश्लेष्मणो विषमग्रयश्च स्नेहोचित (स्नेहसात्म्य) अश्या अवस्थेत स्नेहन करण्यापूर्वी रुक्षण करावे.

- **प्रधान कर्म**
- स्नेह प्रकर्ष काल –
  - क्रूर कोष्ठ – सप्त रात्र
  - मृदु कोष्ठ – तीन रात्र
  - सप्त रात्र पश्चात् स्नेह सात्म्य होते. (सुश्रुत – असात्म्य स्नेह मलांचे प्रेरण करण्यास समर्थ असते. सात्म्य स्नेह तसे समर्थ नसते.)

- **मृदुकोष्ठी**
  - उदीर्णपित्ताऽल्पकफा ग्रहणी मन्दमारूता | मृदुकोष्ठस्य तस्मात् स सुविरेच्यो नरः स्मृतः ||
  - द्रव्य - गुडमिक्षुरसं मस्तु क्षीरमुल्लोडितं दधि | पायसं कृशरा सर्पिः काश्मर्यत्रिफलारसम् ||<br>द्राक्षारसं पीलुरसं जलमुष्णमथापि वा | मद्यं वा तरूणं पीत्वा मृदुकोष्ठो विरिच्यते ||

- **क्रुरकोष्ठी**
  - विरेचयन्ति चैतानि क्रूरकोष्ठं कदाचन | भवति क्रूरकोष्ठस्य ग्रहण्यत्युल्बणानिला ||

- **पश्चात् कर्म**
- उष्णउदकपान – लाभ – स्नेह सम्यक जीर्ण, स्नेहलिप्त मुखाचे शोधन
- तुवरक, भल्लातक तैल पान पश्चात् शीत जलच प्यावे.
- ब्रम्हचर्य, क्षपाशय (फक्त रात्री झोपावे),
- वर्ज्य – प्रवात, हिमआतप आदि

- **स्नेहपान लाभ –**
- सुश्रुत – दीप्तान्तराग्नि: परिशुद्धकोष्ठः प्रत्यग्रधातुर्बलवर्णयुक्तः | दृढेन्द्रियोमन्दजर: शतायु स्नेहोपयोगी पुरुषो भवेत्: ||

- **उपद्रव –**
- स्नेहपान यथाविधि न केल्यास होणारे उपद्रव – ओजोधातुक्षय, तृष्णा
- स्नेहाजीर्ण व तृष्णा चिकित्सा –
  - चरक – शीत जलपान करुन वमन
  - सुश्रुत – उष्ण जलपान करुन वमन, पश्चात् शिरप्रदेशी शीत लेप व शीत स्नान

# स्वेदन

- **Intro**

- स्वेदनाने वात व कफज व्याधि दूर होतात. पुरीष, मूत्र व रेतस मधील अवरोध नष्ट होतो.
- स्नेहन स्वेदन लाभ
    - चरक - शुष्कस्यापि ही काष्ठानि स्नेहस्वेदोपपादने | नमयन्ति यथा न्यायं किम् पुनार्जिवितो नर: || (च.सू. 14)
    - सुश्रुत - लोके काष्ठं स्निग्धमाशु गच्छेद् भग्नं स्वेदयोगैर्गृहीतम् |
    - सुश्रुत - निलीयते न मार्गेषु स्निग्धे भाण्ड इवोदकम् | (स्निग्ध भांड्यावर जसे पाणी थांबत नाही तसे स्नेहन स्वेदन केलेल्या व्यक्तीमध्ये दोष मार्गात थांबत नाहीत. ते कोष्ठापर्यंत सहज येतात.)
    - स्वेदस्तु दोषं नयति द्रवत्वम् | (दोषांना द्रवित करतो) – च.सि 1
- सर्व प्रकार चे स्वेद हे निवात स्थानी व भोजन पचुन गेल्यावर करायला हवे.
- स्वेदनची उपयोगिता – रोगी, ऋतू, व्याधिची अपेक्षा ठेवतो.

- **स्वेदन गुण (सुश्रुत)**

- अग्नेर्दीप्ति मार्दवं त्वक्प्रसादं भक्तश्रद्धा स्त्रोतसां निर्मलत्वम् | कुर्यात् स्वेदो हन्ति निद्रां सतन्द्रा सन्धीन् स्तब्धांश्चेष्टयेदाशु युक्तः ||

- **अवस्थानुसार स्वेद**

- शरीर बल महान असेल तर महान स्वेद, मध्यम बल असेल तर मध्यम स्वेद आणि अल्पबल असेल तर अल्पस्वेद द्यावा.
- वातज रोगांमध्ये - स्निग्धस्वेद, कफज रोगांमध्ये - रुक्ष स्वेद, वातकफज रोगांमध्ये - स्निग्धरुक्ष स्वेद
- आमाशयगत कुपित वात – प्रथम रुक्ष स्वेद पश्चात् स्निग्ध स्वेद
- पक्वाशयगत कुपित कफ – प्रथम स्निग्ध स्वेद पश्चात् रुक्ष स्वेद
- त्रिविध द्वंद्व –
    - अग्नि – निराग्नी एकांग, सर्वांग, रुक्ष, स्निग्ध
- पूर्व स्वेदन – नस्य, बस्ति, संशोधन पूर्व
- पश्चात् स्वेदन – शल्य निर्हरण, उपद्रवरहित मूढगर्भ आणि सम्यक प्रसव पश्चात्
- पूर्व एवं पश्चात् स्वेदन – भगंदर, अर्श, अश्मरी मध्ये शस्त्रकर्मपूर्वी व पश्चात् स्वेदन करावे. (सुश्रुत)
- शारंगधर - स्वेदन – प्लीहा, भगन्दर, अर्श, अश्मरी या व्याधिमध्ये पूर्व, मध्य पश्चात् स्वेदन

- **अवयवानुसार स्वेद –**

- –

| **अवयव** | **स्वेदप्रकार (चरक/ सुश्रुत / शारंगधर / काश्यप)** | **स्वेदप्रकार (अ.हृ)** |
|---|---|---|
| वृषण, हृदय, नेत्र | निषेध. आवश्यकता असल्यास – मृदु स्वेद | स्वल्प स्वेद / न वा |
| वंक्षण | मध्यम स्वेद | अल्प स्वेद |
| शेफ, संधि | काश्यप – मध्यम स्वेद | |
| कृश / मध्यम बालक | काश्यप – आवस्थिक स्वेद | |

मर्मरक्षा

- हृदय रक्षणार्थ - स्वेदन करताना रुग्णाचे हृदय प्रदेशावर शीत वस्त्र, मोती युक्त, कमल युक्त, अथवा शीतल पात्र, हस्ताने वेळोवेळी स्पर्श करावा. याने हृदयावर उष्णतेचा दुष्परिणाम होत नाही.
- नेत्ररक्षणार्थ - शुद्ध नक्त, गोधूम पिण्ड, पद्मोत्पलाने झाकून

- इतर सर्व अवयवांवर आवश्यकतेनुसार मृदु / मध्यम / प्रधान स्वेद करावा.

- सुखपूर्वक स्वेदनसाठी स्वेदन करताना मुखामध्ये कर्पुर किंवा शर्करायुक्त मृद्विका धारण करावे. (काश्यप)

- **स्वेदन पश्चात् कर्म**

- सुश्रुत - निवातशयनस्थितम् अनभिष्यंद भोजन
- अ.हृ – मर्दन, स्नान, स्नेहपान

| साग्नि स्वेद | | निराग्नी स्वेद | | |
|---|---|---|---|---|
| **चरक – 13** | **सुश्रुत / अ.हृ / अ.सं. / शा.सं – 4** | **चरक – 10** | **अ.हृ – 10** | **सुश्रुत – 8** |
| 1) संकर / पिण्ड | 1) ताप – कफनाशक | 1) व्यायाम | 1) आयास | 1) व्यायाम |
| 2) प्रस्तर | 2) उष्ण – कफनाशक | 2) उष्णसदन | 2) निवातगृह | 2) निवात |
| 3) नाडी | 3) उपनाह - | 3) गुरुप्रावरण | 3) गुरुप्रावरण | 3) गुरुप्रावरण |
| 4) परिषेक | 4) द्रव स्वेद | 4) क्षुधा | 4) क्षुधा | 4) अध्व |
| 5) अवगाह | | 5) बहुपान (मद्य) | 5) भूरीपान (मद्य) | 5) भारहरण |
| 6) जेंताक | | 6) भय | 6) भय | 6) नियुद्ध |
| 7) अश्मघन | | 7) क्रोध | 7) क्रोध | 7) क्रोध (अमर्ष) |
| 8) कर्षु | | 8) उपनाह | 8) उपनाह | 8) आतप |
| 9) कुटी | | 9) आहव | 9) आहव | |
| 10) भू | | 10) आतप | 10) आतप | |
| 11) कुम्भ | | | | |
| 12) कूप | | - वात दोष जेंव्हा मेद आणि कफाने आवृत्त असतो तेंव्हा निराग्नी स्वेद उत्तम कार्य करते. | | |
| 13) होलाक | | | | |

*साग्निस्वेद*

- सुश्रुत / अ.हृ / अ.सं. / शारंगधर – 4 –

| साग्नि स्वेद | दोषघ्नता | चरकोक्त स्वेद |
|---|---|---|
| ताप | कफनाशक | Include – जेंताक, कर्षु, कुटी, कूप, होलाक |
| उष्म | कफनाशक | Include – संकर, प्रस्तर, नाडी, अश्मघन, भू, कुम्भी |
| उपनाह | वातनाशक (सुश्रुत), पित्तवात नाशक (शारंगधर) | |
| द्रव स्वेद | कफ / वातपित्त (सुश्रुत), पित्तवात नाशक (शारंगधर | Include – परिषेक, अवगाह |

- सुश्रुतांनी भुस्वेद, अश्मस्वेद, कुम्भीस्वेद, कुटीस्वेद व प्रस्तर स्वेदचे सुद्धा वर्णन केले आहे
- अष्टांग संग्रह – उष्म स्वेदाचे 8 प्रकार - पिण्ड, संस्तर, नाडी, घनाश्म, कुम्भी, कूप, कुटी, जेंताक
- काश्यपनुसार – 8 (अष्टस्वेद) –
    - हस्तस्वेद, प्रदेह, नाडी, प्रस्तर, संकर, उपनाह, अवगाह, परिषेक
    - हस्तस्वेद (4 मास पर्यंतच्या बालकांसाठी उपयुक्त) (काल – 1 मुहूर्त)
    - प्रदेह – योग्य स्थान – गलकर्ण, शिर, मन्या, कर्ण, चिबुक, उर आणि अभिष्यंदजन्य शोथामध्ये
    - संकर – स्थान स्वेदनमिच्छन्ति संकर स्वेद उच्यन्ते |
    - अष्टविध स्वेदमध्ये पटस्वेदचे वर्णन नाही. पटस्वेदचे वर्णन का.सि. 3 मध्ये शोधनकालमध्ये शूल शमनार्थ केले आहे.
    - काश्यप – पट स्वेद – 6 वर्ष पर्यंतच्या बालकांना देतात.

| स्वेद प्रकार | वर्णन |
|---|---|
| संकर / पिण्ड | - उपयोगी द्रव्य - तिलमाषकुलत्थाम्लघृततैलाभिषौदनैः पायसैः कृशरा सिकतापांशुपाषाणकरीषायसपूटकैः<br>- श्लैष्मिक एवं वातज विकारमध्ये उपयोगी |
| प्रस्तर | - उपयोगी द्रव्य - उपरोक्त सर्व तथा शूकशमीधान्यपुलाकानां वेशवारपायसकृशरो उत्कारीका<br>- या द्रव्यांचा अश्मवर प्रस्तर करुन त्यावर कौशय (रेशमी वस्त्र) याने झाकावे. त्याच्यावर पंचाङ्गुल उरूबुकपत्र आच्छादित करुन रुग्णाला झोपवावे.<br>- लांबी - पुरुष प्रमाण (1 व्याम / 3½ हस्त) |
| नाडी | - उपयोगी द्रव्य – वारूणामृतकैरण्डशिग्रुमूलकसर्षपैः यांचा क्काथ<br>भूतीक, पञ्चमूलाभ्यां सुरया दधिमस्तुना \| मूत्रैरम्लैश्च ग्राम्य आनुप उदकं मांसं पयो बस्तशिरस्तथा \|<br>वराहमध्य पित्तासृक् स्नेहवतिलतण्डुला \|\|<br>- नाडी आकृति – गजाग्रहस्तसंस्थानया<br>- लांबी - व्यामदीर्घ तथा व्यामार्धदीर्घया ( ½ व्याम)<br>- अग्र - 1/8 व्याम, मूल - 1/4 व्यामार्ध<br>- सुश्रुत - त्रिवक्रा, ½ व्याम - हस्ती शुण्डीका समान |
| परिषेक | - उपयोगी द्रव्य – दशमूलक्काथ,<br>- वातिक उत्तरवातिकानां (वातप्रधान),<br>- कुम्भीर्वर्षणिका (एकत्र जल धारा पाडणारी झारी / प्रनाडी) |
| अवगाहन | - उपयोगी द्रव्य - वातहरो क्काथ जलघृतदुग्धतैलादि चे कोष्ठक (Tub) मध्ये अवगाहन करावे.<br>- अ.हृ - मूत्रकृच्छ्र, अर्श, वातविकार<br>- नाभीच्या वर 6 अंगुल द्रव्य तथा 4 मुहुर्तापर्यंत प्रयोग करावा. |

| | |
|---|---|
| जेन्ताक | - उत्सेधाविस्तार - परमरत्नीः षोडश (16 अरत्नि)<br>- द्वार - चतुष्किष्कुमात्रं पुरुषप्रमाणं = 3 ½ हस्त<br>- कन्दुसंस्थानं मृण्मयं बहुसुक्ष्मछिद्रं अंगारकोष्ठकस्तभं<br>- दिशा - पूर्व / उत्तर जलाशयाच्या दक्षिण / पश्चिम तटावर असावे.<br>- जलाशय पासून 7-8 अरत्नि दूर असावे<br>- किष्कु - 12 अंगुल<br>- भिंतीला लागुन 1 अरत्नि उंच पीडिकावर रुग्णाला झोपवावे.<br>- कन्दुसंस्थान अग्नि मध्यभागमध्ये असतो.<br>- 1 महुर्त पश्चात सुखोष्ण परिषेक करावे. |
| अश्मघन | - शयानस्य प्रमाणेन घनामश्ममयीं शिलाम्<br>- मारुतघ्न<br>- सुश्रत – खदिरकाष्ठैर्दग्ध्वा |
| कर्षु | - खानयेत् शयनस्य अधः कर्षु (पलंगाच्या खाली खड्डा करावा.)<br>- दीप्तैः धुमैरङ्गारैस्ता कर्षु |
| कुटी | - वृत्ताकार अलोचनाम् (झरोका रहित) कुटी<br>- कुटीच्या मध्य भागामध्ये भिषक् शय्या असते.<br>- प्रावाराजिनकौशेयं कुथकम्बलगोलकैः \|<br>- रूग्नाच्या चारही बाजुला अंगारपूर्ण हसन्तिका असते.<br>- सुश्रुत - चतुर्द्वारं कुटी |
| भूस्वेद | - अश्मघनस्वेदविधिर्भूमी (भूमीवर अश्मघन समान विधि करुन स्वेद देणे) |
| कुम्भीस्वेद | - कुम्भ अर्धभाग किंवा त्रिभाग जमीनीमध्ये शयनच्या खाली गाढावे.<br>- तदनन्तर प्रक्षिपेत् उष्मणा स्विद्यति सुखम् \| |
| कूप स्वेद | - कूप शयन विस्तारच्या द्विगुण खोल असतो.<br>- हस्त्यश्वगोखरोष्ट्राणां करीषैर्दग्धपूरिते |
| होलाक | - धीतीका (आग ठेवण्याचे पात्र) तु करीषाणां<br>- शयनान्तप्रमाणेन<br>- शय्यामुपरी तत्र च |

*उपनाह*

- **उपनाह स्वेद –**

- चरक – निराग्नी स्वेद, सुश्रुत- साग्नि स्वेद, चक्रपाणी, अ.हृ – साग्नि, निराग्नी दोन्हीमध्ये वर्णन

- **उपनाह स्वेदोपयोगी द्रव्य (च.सू. 14)**

- चर्मगुण - सलोम अपूति उष्णवीर्य युक्त चर्माने बांधावे.
- चर्म अभाव असताना – कौशेया (रेशीम वस्त्र) विकशाटकैः

- **अ.हृ –** कफमिश्रित वायु – सुरसादी गणद्वारे उपनाह पित्तमिश्रित वायु – पद्मकादी गणद्वारे उपनाह

- **विधि**

- उष्णकालमध्ये रात्रौ बध्दं दिवा मुञ्चे रात्री दिवाकृतम् |
- उदेश - विदाहपरिहारार्थ
- सुश्रुत - साल्वण उपनाहाचे वर्णन केले आहे.
- सुश्रुत - स्वेदनार्थ काकोल्यादि, एलादि गण प्रयोग

| स्वेद | सुश्रुत | अ.हृ |
|---|---|---|
| तापस्वेद | पाणिकांस्यकन्दुककपालवालुकावस्त्रैः प्रयुज्यते, शयानस्य च अङ्गतो बहुशः खदिरङ्गररिति \| | अग्नितप्त वस्त्रफलकहस्ततलादिभिः \| |
| उष्मस्वेद | कपालपाषाण इष्टकालोहपिण्ड तप्त करुन अम्लादि द्रव्य त्यावर शिंपडून स्वेदन करावे<br>किंवा हस्तिशुण्डाकार अर्धव्याम लांबी, त्रिवक्रा नाडीने स्वेदन करावे. | पत्रभङ्गेन धान्येत् करीषं सिकतातुषः \| |
| द्रवस्वेद | कोष्णकटाहे द्रोण्यां वा अवगाह्य स्वेदयेत | |

# वमन व विरेचन

- **Intro**
- वमन पर्याय – उल्लेखन विरेचन पर्याय – प्रस्कन्दन
- शारंगधर नुसार **उर्ध्व-अधो शोधनार्थ श्रेष्ठ द्रव्य** – देवदाली फल

- **वमन व विरेचन मधील फरक**
- सुश्रुत –
  - विरेचन द्रव्य हे सर, सूक्ष्म, तीक्ष्ण, उष्ण, विकाशि गुणांनी दोषांना अधोमार्गाने दूर करतात. वमन द्रव्य स्वभावाने कार्य करुन उर्ध्वमार्गाने दोषांना बाहेर काढतात. (चरक – उदान वायुने प्रेरित होवून वमन द्रव्य दोषांना बाहेर काढतात)
  - विरेचनकारी द्रव्य हे पच्यमान (पक्व) द्रव्य व दोषांना बाहेर काढतात. वमनकारी द्रव्य हे अपक्व अवस्थामध्येच द्रव्य व दोषांना बाहेर काढतात. (चरकांनुसार हे कार्य महाभूतांच्या भिन्नतामुळे होते.)

## पूर्वकर्म

- लंघन, दीपन, पाचन, रुक्षण (गरज पडल्यास), स्नेहन, स्वेदन हे वमन / विरेचनच्या पूर्वकर्मामध्ये येतात.

### 1) लंघन, दीपन, पाचन

- पंचकर्मापूर्वी लंघन करायची आवश्यकता – निराम अवस्थेत स्नेहपान व्यवस्थित कार्य करते. पण जर सामता असेल तर तेच स्नेह विषाप्रमाणे कार्य करते. म्हणून स्नेहपान सुरु करण्यापूर्वी लंघन, दीपन, पाचन हे करावेच लागते.
- सामता लक्षण – स्त्रोतोरोध बलभ्रंश गौरवानिल मूढता | आलस्य अपक्ति निष्ठिव मलसंगऽरूचि क्लमः || - अ.हृ.सु 13
- लंघन कार्य – क्षपिते दोषे, दीप्ते अग्ने, लाघव, स्वस्थ्य, क्षुत, तृट, रूचि, बल, उत्साह, ओज जायते – अ.हृ.चि 1

### 2) रुक्षण

- वर्णन – अ.हृ.सु 16
- कफप्रधान व्याधि, कफप्रधान प्रकृति व मेदस्वी रुग्णामध्ये स्नेहन स्वेदन पूर्वी रुक्षण करावे. कारण या व्यक्तींमध्ये स्नेहानाचा मिथ्या योग होवू शकतो म्हणून स्नेहन करण्यापूर्वी रुक्षण करुन अतिरिक्त स्निग्धता कमी करावी.

### 3) स्नेहन

- वमन व विरेचन पूर्वी स्नेहन कर्म हे स्नेहपानद्वारे केले जाते.
- यामध्ये वर्धमान मात्रेत स्नेहपान दिले जाते.
- सुश्रुत – दोषानुसार घृतपान
  - पैत्तिक घृत – फक्त घृत
  - वातिक रोग – लवणान्वित घृत
  - कफज रोग – व्योषक्षाररस मिश्रित घृत

- **स्नेहपान काल / स्नेह प्रहर्ष काल**
- चरक – शोधन पूर्व 3 ते 7 दिवस स्नेहन करावे.
- मृदुकोष्ठी – 3 दिवसापर्यंत क्रूरकोष्ठी – 7 दिवसापर्यंत मध्यम कोष्ठी – 3-7 दिवसापर्यंत
- 7 दिवसापेक्षा अधिक काल स्नेहन देवू नये. 7 दिवस पश्चात् स्नेहन क्रिया सात्म्य होते.

- **मृदु कोष्ठ परिक्षण** - च.सु. १३
- गुड इ. द्रव्याने सृष्ट मलप्रवृत्ति किंवा 2-3 वेळा मल प्रवृत्ति झाली तर ते मृदु कोष्ठ आहे असे जाणावे.

- **स्नेहपान पूर्वकर्म** –
- "द्रवोष्णम् ................ श्वः स्नेह पातुमिच्छता |" - च.सु. १३/६०
- स्नेहपान पूर्व 1 दिवस भोजन – द्रव, उष्ण, अनभिष्यंदी, नीति स्निग्ध, असंकीर्ण (2 पेक्षा अधिक गोष्टी एकत्र न केलेले)
- पादहिन् भोजन – टीकाकार –
  - उत्तम अग्नि असेल तर नेहमीच्या आहाराच्या ¼ भाग कमी खाणे.
  - मध्यम अग्नि मध्ये 2/4 भाग कमी खाणे.
  - अल्प अग्नि मध्ये 3/4 भाग कमी आहार खाणे.

- **अवस्थेनुसार स्नेहपान**
- संशोधनार्थ स्नेहपान – मध्यम मात्रा स्नेह – रात्रीचे भोजन जीर्ण झाल्यावर सकाळी अनुषा पोटी
- संशमनार्थ स्नेहपान – उत्तम मात्रा स्नेह – भोजनच्या वेळी भूक लागल्यावर
- मंदाग्नि व क्रूरकोष्ठमध्ये अग्निदीपनार्थ सक्षारलवण घृत देवून स्नेहन करावे. – चरक / सुश्रुत
- सामपित्तमध्ये केवल घृतपान निषिद्ध आहे. निराम पित्तमध्ये अच्छपान करावे. – चरक
- वमन विरेचनच्या मध्ये मध्ये स्नेहन व स्वेदन करावे. तसेच समाप्ति पश्चात् स्नेहाचा प्रयोग करावा. – च.सि 6
- भोजनपूर्वी स्नेहपान केल्यास शरीराच्या अधोभागातील रोगांचा, भोजनच्या मध्यात स्नेहपान केल्यास शरीराच्या मध्यभागातील रोगांचा, तसेच भोजन पश्चात् स्नेहपान केल्यास शरीराच्या उर्ध्वभागातील रोगांचा नाश होतो – अ.हृ

- **स्नेहपान सुरु असताना पथ्य** – च. सु. १३
- उष्णोदकोपचारी – सर्वार्थ उष्ण जल च वापरणे. (पिणे, स्नान, कवल इ.)
- ब्रम्हचारी
- क्षपाशय – क्षपा म्हणजे रात्र आणि शय म्हणजे निद्रा. म्हणजेच रात्री झोपावे. याचाच अर्थ दिवसा झोपू नये.
- न वेगान् धारयेत्
- व्यायाम - व्यायाम हे कोष्ठशाखा गतितील एक कारण आहे म्हणून व्यायाम वर्ज्य
- उच्चैर्वचन – उदानाचे कोणतेही काम जास्त झाले तर त्वरित बल हानि जाणवते. (कारण बल हे उदानाकडे असते.)
- क्रोध, शोक वर्ज्य, अप्रवातम्
- हिम वर्ज्य - हिम म्हणजे शीत पेक्षा अधिक थंड
- स्नेह प्रतिभुंजान - स्नेहपान पश्चात त्यादिवशी भूक लागल्यावर देणाऱ्या आहारामध्येही स्नेह / स्निग्ध असावेच.

### 4) स्वेदन –

- रुग्ण व व्याधि अनुसार स्वेदन प्रकार निवडावा.
- उदा – वातरक्तमध्ये बाष्प स्वेद, परिषेक, अवगाह     कुष्ठ – स्थानिक स्वेद     तमक श्वास – उरप्रदेशी पिण्ड स्वेद.

### 5) स्नेह विराम काल

- स्नेहपानाचे सम्यक लक्षण दिसल्यावर रुग्णाला विराम द्यावा लागतो. या विराम काळामध्ये दोष शाखेतुन कोष्ठामध्ये येत असतात.
- चरक / अष्टांग हृदय - वमनार्थ - 1 दिवस,     विरेचनार्थ - 3 दिवस
- काश्यप - रोगावस्था असताना सम्यक स्नेहन झाल्यावर 3 ऱ्या दिवशी वमन एवं 4 थ्या दिवशी विरेचन करावे.
- या विराम काळामध्ये दोषांच्या लक्षणावर लक्ष ठेवून दोषांची प्रवृत्ति वमनाकडे आहे की विरेचनाकडे आहे ते ठरवावे लागते.
- स्नेहपान पश्चात् सम्यक वमन / सम्यक विरेचन साठी योग्य अवस्था
  - कफवृद्धि असताना – सम्यक वमन होते | मन्द कफ असताना - सम्यक विरेचन होते.
  - अ.सं – जीर्णान्ने वमनं योज्यं कफे जीर्णे विरेचनम् |
  - अल्प कफ दोष अवस्थामध्ये जर वमन औषध सेवन केले तर विरेचन आणि कफ दोष वृद्धि असताना विरेचन औषध सेवन केल्यास वमन होते.
  - वमन योग्य अवस्थेत वमन न देता विरेचन दिले तर
    - शारंगधर - कफ ग्रहणीला आच्छादित करतो
    - चरक – प्रवाहिका होतो.
    - सुश्रुत - श्लेष्मा ग्रहणी छादयति, गौरव, प्रवाहिका
- दोषांची प्रवृत्ति समजल्यानंतर त्या दोषाचा उत्क्लेषण आहार घ्यावा

### 6) उत्क्लेषण आहार

- वमन किंवा विरेचन करायच्या आदल्या दिवशी संध्याकाळी उत्क्लेषण आहार घ्यावा. उत्क्लेषण म्हणजे दोषांना बाहेर पडायला प्रवृत्त करायला लावणारा आहार.
- कफ किंवा कफप्रधान संयोगमध्ये वमन करावे. पित्त किंवा पित्तप्रधान संयोगामध्ये विरेचन करावे. वात किंवा वातप्रधान संयोगामध्ये बस्ति करावी.

| **Ref** | **वमनार्थ उत्क्लेषण आहार** | **विरेचनार्थ उत्क्लेषण आहार** |
|---|---|---|
| च.सि 1 | ग्राम्य, आनुप प्रदेशाचे मांसरस, मांसरससोबत दूध घ्यावे | जांगल मांसरस एवं कफ अवृद्धिकर यूष द्यावे. |
| च.सि 6 | कफवर्धक, सुपाच्य द्रव आहार | लघु अशीत आहार |
| च.क 1 | क्षीर, दधि, माष, तिल, शाकादी | विरेचनच्या पूर्व दिवशी पेया द्यावी |
| सुश्रुत | | पुर्वान्हे लघु भोजयेत्, फलाम्लमुष्णोदकं चैनमनुपाययेत् |

# प्रधान कर्म

- वमनार्थ / विरेचानार्थ उपयुक्त औषधांपैकी गरजेनुसार एक कल्प व मात्रा निवडावी

- **काश्यप संहितानुसार वमन / विरेचनार्थ कषायपान मात्रा**

| मात्रा प्रकार | वमनार्थ | विरेचानार्थ |
|---|---|---|
| उत्तम | 4 अंजलि | 2 अंजलि |
| मध्यम | 3 अंजलि | 1½ अंजलि |
| हीन | 2 अंजलि | 1 अंजलि |

- **शारंगधरनुसार वमनार्थ व विरेचनार्थ मात्रा**

| | वमनार्थ | | विरेचानार्थ | |
|---|---|---|---|---|
| मात्रा प्रकार | क्वाथ मात्रा | चूर्ण / कल्क / अवलेह मात्रा | क्वाथ मात्रा | चूर्ण / कल्क / अवलेह मात्रा |
| उत्तम | 9 प्रस्थ | 3 पल | 2 पल | 4 तोला |
| मध्यम | 6 प्रस्थ | 2 पल | 1 पल | 2 तोला |
| हीन | 3 प्रस्थ | 1 पल | ½ पल | 1 तोला |

- सामान्य त्रिवृतादि साम्लयोग - 1 अक्ष मात्रा | अभयादि मोदक वर्णन - शारंगधर
- **सुश्रुत** - अग्निबल, व्याधिबलानुसार मध्यम संशोधनार्थ मात्रा
  - क्वाथ – 1 अंजली | चूर्ण – 1 बिडाल पदक | कल्क – 1 अक्ष

- **वमन विधि**
- वमन उपाशी पोटी करू नये – सुश्रुत
- वमन – पूर्वान्हकाली - बलवान रुग्णामध्ये – प्रातर्निरन्नो, दुर्बल रोगीमध्ये – लघुपथ्यान्नैर्युक्तमद्यात् – च.चि 30
- वमन द्यायच्या दिवशी प्रात:काली स्नेहन स्वेदन न करता यवागू व घृत पिण्यास द्यावी – चरक क. 1
- वमन विरेचनसाठी श्रेष्ठ काल – पूर्वान्ह, जीर्णाहार लक्षण – च.क 1
- कल्प - मदनफल कषाय + मधु, यष्टीमधु, सैंधव, फाणित – पान
- मदनफल मात्रा – 1 अन्तर्नखमुष्टि
- मधु, सैंधव – कफविलयनार्थ. मधु अपक्व अवस्थेतच बाहेर पडतो. (च.क 1)
- मंत्र - "ॐ ब्रम्हदक्षाश्विरुद्रेन्द्रभूचन्द्रार्कानिलानल: ....... |" (च.क 1)
- वमन द्रव्य पिल्यानंतर 1 मुहूर्त प्रतिक्षा करावी. वमन द्रव्य पिल्यानंतर दिसणारे लक्षण (च.सू 15)
  - स्वेद प्रादुर्भाव → दोषांचे विलयन होत आहे.
  - लोमहर्ष → दोष आपल्या स्थानापासून प्रचलित होतात
  - कुक्षी आध्मान → दोष कुक्षीमध्ये येतात
  - हृल्लास, आस्यस्त्रवण → दोष उर्ध्वमुखी होतात.
- हृल्लासादि लक्षणे दिसू लागल्यावर वमनोपग द्रव्य पिण्यास सुरु करावे. वमनोपग द्रव्य आकण्ठपान केल्यावर वमन सुरु होतात.
- उत्तम वेग लक्षण - स्वयं प्रवृत्त, न अति महति व्यथा, सदोष वेग प्रवृत्ति, स्वयं शांत होणारे, अनिर्बंध (थांबुन थांबुन न येणारे)
- हीन वेग अवस्थामध्ये – पिपल्यामलक, सर्षप, वचा कल्क लवणोष्णोदक पुन:-पुन: प्रयोग करावे (च.क 1)

- **विरेचन विधि**
- विरेचन उपाशी पोटी करावे. अज्ञात कोष्ठी व्यक्तिमध्ये मृदु औषधाने विरेचन करावे.
- कल्प – त्रिवृत कल्क – 1 अक्ष मात्रा – जल / द्रवमध्ये मिसळूण प्यावे
- दीप्ताग्निमध्ये विरेचन औषध घेतल्यास ते औषध जीर्ण होवून जाते आणि विरेचन करू शकत नाही. (म्हणून अग्निदीपन – भूक लागण्यापुर्वीच सकाळी विरेचन सुरु करावे)
- विरेचन औषधी प्रात:काली घेतल्यावर 3 प्रहर (9 तास) मध्ये पाक होते.
- विरेचनोपग द्रव्य मध्ये मध्ये प्यावे लागते.
- विरेचन औषध पान पश्चात् अपथ्य - सुश्रुत – न वेगधारण, निवात शयन, न शीताम्बु स्पर्श, न प्रवाहण

- **ऋतुनुसार विरेचन अनुपान (च.सि.)**
- शिशिर वसंत – मधु ग्रीष्म – शर्करा वर्षा शरद – द्राक्षारस
- हेमंत – उष्णोदक सर्व ऋतु - सर्वऋतूक योग (च.)

- **निशोथ विरेचन योग - ऋतुनुसार अनुपान - च.सि 7**
- ग्रीष्म – उष्णाम्बु वर्षा – क्षौद्र + द्राक्षारस शरद - द्राक्षाम्बु
- हेमंत - उष्णाम्बु सर्व ऋतु - सर्वऋतु योग + उष्णाम्बु सह

# विरेचन

- **शारंगधर** –
- विरेचन योग्य ऋतु - शरद, वसंत

- **ग्रीष्मकालीन विरेचन योग** – सुश्रुत
- शर्करा, त्रिवृत – 2 माशा,
- चूर्ण - अनुपान कोष्णजल

- **कोष्ठानुसार विरेचन**
- मृदु कोष्ठ – मृद्विका, दुग्ध, एरण्डतेल
- मध्य कोष्ठ - निशोथ, कुटकी, अमलतास
- क्रुर कोष्ठ - स्नुही, स्वर्णक्षीरी, दन्तीबीज

- **वर्षाकालिन विरेचन योग** – सुश्रुत
- त्रिवृतं कुटकबीजं पिप्पली विश्वभेषजम् |
- अनुपान – मनुका + मधु

- **दोषांनुसार विरेचन द्रव्य**
- वात – निशोथ, सैंधव, शुण्ठी, जांगल मांसरस, अम्ल
- पित्त – त्रिवृत, द्राक्षा
- कफ – त्रिफलाक्वाथ, गोमूत्र, त्रिकटु चूर्ण

- **सुश्रुत - कोष्ठ व दोषानुसार मात्रा**

| **कोष्ठ** | **दोष (सुश्रुत)** | **औषध मात्रा** | **विरेचन** |
|---|---|---|---|
| मृदु | पित्त | मृदु मात्रा | फक्त दुधानेसुद्धा विरेचन होते |
| क्रूर | वात, कफ | तीक्ष्ण मात्रा | दुर्विरेच्य (लवकर विरेचन होत नाही) |
| मध्यम | समदोष | मध्यम मात्रा | |

- **कर्म, परिभाषा व उदहारण**
- अनुलोमन – मल पक्व करुन – हरितकी
- स्रंसन – बिना पक्व करता – अमलतास (आरग्वध)
- भेदन - बद्ध अबद्ध मल भेदन – कुटकी
- रेचन - पक्वअपक्व मल द्रव करुन - स्नुही

- **श्रेष्ठ विरेचक द्रव्य (सुश्रुत)**
- मूल - अरुणाभ त्रिवृत
- त्वक – लोध्र
- फल – हरितकी
- तैल – एरण्ड
- स्वरस – कारवेल्लक
- पय - सुधा (स्नुही)

- **चरकांनुसार अग्र्य द्रव्य**
- त्रिवृत्त - सुखविरेचन
- चतुरंगुल – मृदुविरेचन
- स्नुहीपय - तीक्ष्णविरेचन

- **विरेचनार्थ श्रेष्ठ** –
- काश्यप – एरण्ड तैल एवं शंखिनी

- **तीक्ष्ण विरेचक द्रव्य वर्णन**
- सुखं क्षिप्रं महावेगमसक्तं यत् प्रवर्तते | नातिग्लानिकरं पायौ (गुद) हृद्ये न च रूक् करम् || अन्तराशयमक्षिण्वन् कृत्स्नं दोषं निरस्यति || – च. क 12

- **द्रव्य अंगानुसार 7 प्रकार**
- क्षीर, रस, कल्क, कषाय, शृत, शीत, चूर्ण

- वमन / विरेचनसाठी औषध दिले असता त्याचा अवरोध झाल्यावर, व वेग येत नसताना, तसेच उद्गार, अंगमर्द इत्यादी लक्षणे असताना स्वेदन प्रयोग करावे. – च.क 12
- रुक्ष, बहु अनिल, क्रूर कोष्ठ, व्यायामशालि, दीप्ताग्नी – यांच्यामध्ये अनुवासन बस्ति देवून विरेचन प्रयोग करावा.
- अत्याधिक स्नेहपान पश्चात् स्नेहविरेचन देवू नये – अन्यथा दोषा: प्रचलिता: स्थानाद् (सुश्रुत)

# वमन विरेचन पश्चात् कर्म

- **रुग्ण परीक्षा लक्षण – 4** - वैगिकी, मानकी, आंतिकी, लैंगीकी
- रुग्णाचे वमन किंवा विरेचन हे सम्यक झाले आहे का? झाले असल्यास प्रधान-मध्यम-हीनशुद्धि पैकी नेमकी कोणती शुद्धि आहे? आणि नसल्यास त्याचा हीन् योग की अतियोग झाला आहे? हे सर्व तपासण्यासाठी सर्वप्रथम हे चार परीक्षा कराव्यात.

## 1) आंतिकी परीक्षा

- वमन किंवा विरेचनमध्ये शेवटच्या वेगेमधून कोणता दोष बाहेर पडला ते पाहणे याला आंतिकी परीक्षा म्हणतात.
  - ✓ पित्तान्त वमन - सम्यक वमन
  - ✓ कफान्त विरेचन - सम्यक विरेचन (सुश्रुत - एको विरेक: श्लेष्मनो न द्वितीयो अस्ति कश्चन | - कफान्त हेच एकमात्र सम्यक विरेचनचे लक्षण आहे)

- **शोधन क्रियामध्ये औषध व दोष बाहेर येण्याचा क्रम**
- वमन क्रम
  - चरक – कफपित्तवात
  - सुश्रत – प्रसेक औषधकफपित्तअनिले
  - वाग्भट – स्वेद, प्रसेक, औषध, कफ, पित्त, वात

- विरेचन क्रम –
  - चरक – विट्पित्तकफवात
  - सुश्रुत - मूत्रपूरीष पित्त औषध कफ वात
  - वाग्भट – वात, मूत्र, विट्, पित्त, कफ, वात

- बस्ति क्रम
  - चरक – विट्श्लेष्मपित्तानिलमूत्र
  - सुश्रुत – विट्पित्तकफवात
  - काश्यप - पुरीष मारुतः पित्तं कफश्च

## 2) मानकी परीक्षा

✓ वमन किंवा विरेचन मध्ये किती मात्रेत (मान) दोष बाहेर पडले हे पाहणे याला मानकी परीक्षा म्हणतात

| | **शुद्धि प्रकार** | **चरक** | **काश्यप खिल (पुरुषांसाठी)** | **काश्यप सिद्धि (बालकांसाठी)** | **सुश्रुत** | **अहृ.** |
|---|---|---|---|---|---|---|
| वमन | प्रधान | 2 प्रस्थ | 2 प्रस्थ | --- | 4 प्रस्थ | 2 प्रस्थ |
| | मध्यम | 1.5 प्रस्थ | 1.5 प्रस्थ | --- | 2 प्रस्थ | 1 प्रस्थ |
| | हीन | 1 प्रस्थ | 1 प्रस्थ | --- | 1 प्रस्थ | 0.5 प्रस्थ |
| विरेचन | प्रधान | 4 प्रस्थ | 4 प्रस्थ | 3 प्रस्थ | 4 प्रस्थ | 4 प्रस्थ |
| | मध्यम | 3 प्रस्थ | 3 प्रस्थ | 2 प्रस्थ | 2 प्रस्थ | 2 प्रस्थ |
| | हीन | 2 प्रस्थ | 2 प्रस्थ | 1 प्रस्थ | 1 प्रस्थ | 1 प्रस्थ |

- वमन, विरेचन व रक्तमोक्षणमध्ये 1 प्रस्थ = 13.5 पल असते.

## 3) लैंगिकी परीक्षा

- लक्षणांवरून परीक्षा करणे.
- सम्यक योग, हीनयोग, अतियोग यांचे लक्षण पुढे chartमध्ये दिले आहेत.

## 4) वैगिकी परीक्षा

| | | चरक / अ.हृ | कौत्स्य (काश्यप संहिता) | काश्यप |
|---|---|---|---|---|
| वमन | प्रधान | 8 | 6 – 7 | 8 |
| | मध्यम | 6 | 4 – 5 | 6 |
| | हीन | 4 | 2 – 3 | 4 |
| विरेचन | प्रधान | 30 | 30 | 30 |
| | मध्यम | 20 | 15 | 15 |
| | हीन | 10 | 10 | 10 |

- विरेचनचे वेग मोजताना सुरुवातीचे 2 – 3 मलमिश्रित वेग सोडून पुढचे मोजावे.

- **वमन पश्चात् कर्म**

- 1 मुहूर्त आराम करावा
- गरजेनुसार स्नेहिक, प्रायोगिक, विरेचनिक धूमपान करावा.
- सुखोष्ण जलाने हात, पाय, मुख धुवावे / स्नान करावे. (सुश्रुत - अपरान्हकाली)
- पश्चात् संसर्जन क्रम सुरु करावा.
- परिहार काल - पंचकर्म पश्चात् पथ्य पालनचा कालावधी
    - चरक
        - द्विपरिहार काल - शोधन कर्म करायला जितके दिवस लागले त्याच्या दुप्पट दिवसापर्यंत विधिपूर्वक अहितकर आहार - विहारचा परित्याग करावा.
    - सुश्रुत / शारंगधर - शोधन परिहार काल (सिरावेध / शोधन)
        - 1 मास / पुन्हा बलवान होवू पर्यंत

- **विरेचन पश्चात् कर्म**

- वमन समान. फक्त धूमपान करू नये.
- वमन / विरेचन पश्चात् – उष्णोदक प्रयोग (च.सि 4)
- वमन / विरेचन पश्चात् – स्नेहप्रयोग – बलवृद्ध्यार्थ (च.सि 6)

- **संशोधन पश्चात् रक्षार्थ विधान**

- च.सि 12
    - यथाऽण्ड तरुणं, पूर्ण तैलपात्र, गोपाल इव दण्डीगा:
      या प्रमाणे संशोधन पश्चात् त्या व्यक्तीची काळजी घ्यावी.

- **पंचकर्म पश्चात् अयोग्य आहार विहार**

- चरक – पंचकर्म करण्यासाठी जितका वेळ लागला त्याच्या दुप्पट काल पथ्य पालन करावे. (सुश्रुत – 1 मास पथ्य पालन करावे)
    - अत्यासन (अधिक बसने), स्थान (उभे राहणे), वंचांसि (बोलणे), यानं (प्रवास), स्वप्नंदिवा, मैथुन, वेगरोधान्
    - शीतउपचार, आतप शोकरोपांत् स्त्याजेत् अकाल अहितभोजनं

- **अष्टमहादोषकर भाव, त्याचे परिणाम व चिकित्सा – च.सि 12**

| अष्टमहादोषकर भाव | परिणाम | चिकित्सा |
|---|---|---|
| **1) उच्चैर्भाष्यं** | देहोर्ध्वविकार - तिमिर, तमकश्वास, **मन्यास्तम्भ**, उर:शूल आदि | स्नेहन, स्वेदन, उपनाह, धूमपान, नस्य, अभक्त स्नेहपान, मांसरस, दूध, मौन (न बोलणे) |
| **2) रथक्षोभ** | च - सर्वविकार – पार्श्ववङ्क्षणवृषणकटिवेदना, **ग्रीवा दौर्बल्य**, नासाकर्णशिर शूल<br>का - वातप्रकोप | चिकित्सा - वातहर कर्म, निदान परिवर्जन |
| **3) अति चङ्क्रमण** | च - अधोविकार - सक्थिसाद, पिष्डिकोद्वेष्टन, **सिराधमनीहर्ष**<br>का - **शर्करा, अश्मरी**, खल्ली | चिकित्सा - रथक्षोभ समान |
| **4) आसन** | च - मध्य विकार - स्फिक्पार्श्ववङ्क्षणवृषणकटिपृष्ठवेदना<br>का - **वातशोणित**, **कफप्रसेक** | |
| **5) अजीर्ण** | च - आम – वमन, अतिसार, मूर्च्छा, ज्वर, प्रवाहण, आमविष<br>का - **व्याधिवर्धते**, शरीर कार्श्य | लंघन, पाचन, दीपन |
| **6) अहितभोजन** | दोषज विकार - अनन्नभिलाषा, विषमभोजन, कण्डू, पामा, गात्रावसाद, ग्रहणी, अर्श आदि | दोषहरः क्रिया |
| **7) दिवास्वप्न** | श्लेष्मज विकार – अरोचक, अविपाक, अग्निनाश, पाण्डू, कण्डू, पामा, ग्रन्थि, **रक्तवर्ण मूत्र**, अक्षितालुलेपन | अरिष्ट सेवन, प्रघर्षण, उन्मर्दन, परिषेचन, श्लेष्महरः सर्वो विधि: |
| **8) मैथुन** | च - धातुक्षय विकार - हृदयस्पंदन, स्वरावसाद, बाधिर्य, विषाद, **अवलुप्यत इव गुद**, ताडयत इव मेढ्र, वेपते हृदयं, **पीडयन्ते सन्धय**, तम प्रवेश<br>का - षाण्ढ्य, पाण्डुत्व | जीवनीय द्रव्यांनी सिद्ध क्षीरसर्पि, यापनबस्ति, अनुवासन बस्ति, विदारीगन्धादि अथवा जीवनीय सिद्ध उत्तरबस्ति |

- **काश्यप अष्टभावांचा त्याग**

1) अजीर्ण 2) मैथुन 3)यान 4)उच्चैभाष्य 5)दिवाशयन 6)अतिचंक्रमण 7)एकासन (स्थान) 8)असात्म्य

## संसर्जन क्रम

- संसर्जन काल –
  - चरक / सुश्रुत – 7 दिवस
  - काश्यप – 11 दिवस
- संसर्जन क्रम लाभचे उदा. – थोड्याश्या तृण गोमयादिने अग्निचे संधुक्षण होते. – च.सि 1

- **क्रम**

  "पेया विलेपि अकृतकृतं च युषं रसं त्रिद्वैरअथएकशश्च | प्रधान मध्यावर शुद्धि: शुद्ध...................................||"

- टिकाकार – अकृतकृत – हा एकच शब्द आहे व याचा अर्थ इषत संस्कार केलेले असा आहे.

- च.सु. 15 मध्ये उत्तम शुद्धिसाठीचे संसर्जन क्रमाचे व्यवस्थित वर्णन केले आहे. ते खालील प्रमाणे

**1) पेया**

- अथैनं सायान्हे परे वा अन्हि - शोधन झाल्यावर संध्याकाळी किंवा जर संध्याकाळी भूक लागलीच नाही तर पुढच्या दिवशी सकाळी संसर्जन क्रम सुरु करावा.
- सुखोदक परिषीक्त - सुखोदकाने स्नान करावे.
- पुराणानां लोहितशालितण्डूलानां सु अवक्लिन्ना मण्डपूर्वा सुखोष्णा यवागूं पाययेद् अग्निबलम् अभिसमीक्ष्य (पूर्वा म्हणजे प्रधान) पुराण लोहित शालितण्डूल पासून चांगले पक्व असे मण्डपूर्वा यवागू म्हणजेच पेया द्यावी.
- एवं द्वितीय तृतीय च अन्नकाले - 2nd व 3rd अन्नकाळी सुद्धा same पेया घ्यावी
- पेया योग्य अवस्था - क्षीणं तुषार्तं सुविरेचितं च तन्वी सुखोष्णां लघु पाययेत् | (सु.चि 33)
- पेया वर्ज्य - मन्दाग्निमक्षीणमसद्विरिक्तं न पाययेताहनि तत्र पेयाम् | (सु.चि 33)

**2) विलेपि**

- चतुर्थे तू अन्नकाले तथा विधानां एव शालितण्डूलानां उत्स्विन्नां विलेपीं उष्णोदक द्वितीयां अस्नेहलवणाम्, अल्प स्नेह लवणाम् वा भोजयेत्
- चतुर्थ अन्नकाळी पुराण शालितण्डूल याने पक्व असे विलेपि + उष्णोदक वापरावे.
- विलेपी – a) अस्नेहलवणाम् – अकृत

  b) अल्पस्नेहलवणाम् – कृत
- विलेपी अश्या दोन प्रकाराची असते. जर अस्नेहलवणाम् विलेपीने भूक शांत होत नसेल तर अल्पस्नेहलवणाम् विलेपी वापरावी असा अर्थ आहे. (apply to पेया, युष, रस also)
- एवं पंचमे षष्ठे च अन्नकाले - same यवागू 5th & 6th अन्नकाळी घ्यावी

**3) युष**

- सप्तमे तु अन्नकाले तथा विधानां एव शालिनां द्विप्रसुतं सुस्विन्नम् ओदनं उष्णोदक अनुपान तनुनां तनु स्नेह लवणोपपन्नेन मुद्ग युषेण भोजयेत्
- सप्तम अन्नकाळी – शालि 2 प्रसृत (2 x 80 = 160 gm) घेवुन त्याचा सुस्विन्न भात तयार करावा व त्यासोबत अल्पस्नेह लवण युक्त मुद्गयुष खावा.
- एवम् अष्टमे नवमे च अन्नकाले - same 8th & 9th अन्नकाळी

**4) रस (मांसरस)**

- दशमे तु अन्नकाले लावकपिज्जलादीनाम् अन्यतमस्य मांसरसेन औदक लावणिकेन नातिसारवता भोजयेद उष्णोदकानुपानं
- दशम अन्नकाळी लावक इ. मांसरसासोबत भात खावा. (हे सुद्धा अस्नेहलवणाम् किंवा अल्पस्नेहलवण युक्त)
- एवं एकादशे द्वादशे च अन्नकाले - same 11th & 12th अन्नकाळी
- अत ऊर्ध्वं अन्नगुणान् क्रमेण उपभुन्जान: सप्तरात्रेण प्रकृति भोजनम् आगच्छेत || त्यापश्चात् प्रकृतिनुसार भोजन करावे.

आता संसर्जन क्रम मध्ये 4 आहारीय कल्पना आहेत हे समजले. ह्या 4 आहारीय कल्पना कोणत्याप्रकारची शुद्धि झाली आहे त्यानुसार किती वेळा घ्यायची हे ठरवावे. म्हणजे उत्तम शुद्धि मध्ये त्रि (प्रत्येक आहारीय कल्पना 3 अन्नकाळी) घेणे. मध्यम मध्ये द्वि (प्रत्येक आहारीय कल्पना 2 अन्नकाळी घेणे) व हीन् मध्ये 1 (प्रत्येक आहारीय कल्पना एकच अन्नकाळी घेणे)

म्हणून –

| शुद्धि प्रकार | आहारीय कल्पना | प्रत्येकी अन्नकाळ | total अन्नकाळ | total दिवस |
|---|---|---|---|---|

| | (पेया इ. ४) | (त्रिद्वैरअथएकशश्च) | | |
|---|---|---|---|---|
| हीन् शुद्धि | 4 | 1 | 4 x 1 = 4 | 3 |
| मध्यम शुद्धि | 4 | 2 | 4 x 2 = 8 | 5 |
| उत्तम शुद्धि | 4 | 3 | 4 x 3 = 12 | 7 |

| **दिवस** | **वेळ** | **अन्नकाल क्रमांक** | **आहारीय कल्पना** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **हीन् शुद्धि** (प्रत्येकी 1 अन्नकाल) | **मध्यम शुद्धि** (प्रत्येकी 2 अन्नकाल) | **उत्तम शुद्धि** (प्रत्येकी 3 अन्नकाल) |
| प्रथम | सकाळ | - | शोधन | शोधन | शोधन |
| | संध्याकाळ | 1 | पेया | पेया | पेया |
| द्वितीय | सकाळ | 2 | विलेपी | पेया | पेया |
| | संध्याकाळ | 3 | युष + ओदन | विलेपी | पेया |
| तृतीय | सकाळ | 4 | मांसरस + ओदन | विलेपी | विलेपी |
| | संध्याकाळ | 5 | पथ्याहार सुरु | युष + ओदन | विलेपी |
| चतुर्थ | सकाळ | 6 | | युष + ओदन | विलेपी |
| | संध्याकाळ | 7 | | मांसरस + ओदन | युष + ओदन |
| पंचम | सकाळ | 8 | | मांसरस + ओदन | युष + ओदन |
| | संध्याकाळ | 9 | | पथ्याहार सुरु | युष + ओदन |
| षष्ठी | सकाळ | 10 | | | मांसरस + ओदन |
| | संध्याकाळ | 11 | | | मांसरस + ओदन |
| सप्तम | सकाळ | 12 | | | मांसरस + ओदन |
| | संध्याकाळ | 13 | | | पथ्याहार सुरु |

- **विशिष्ट अवस्थानुसार संसर्जन क्रममधील बदल**
  - च.सि 6 –
    - अवस्था – कफपित्ते विशुद्धेऽल्पं, मद्यपी, वातपित्त प्रकृति रोगी
    - उपरोक्त अवस्था मध्ये पेयादी प्रयोगाने स्त्रोतस अभिष्यंदी होतात. म्हणून या अवस्थेमध्ये पेयादी ऐवजी तर्पणादी प्रयोग करावा.
    - तर्पणादी प्रयोग लाभ – अग्निवृद्धि, प्राणविवृद्धयर्थ
  - च.चि 1 - रसायन सेवन पूर्व शोधन करावे लागते. तत्पश्चात् शुद्धिप्रमाणे 3 – 7 दिवस यवागू पान करावे.

- **संसर्जनमध्ये रसप्रयोग क्रम**
  - च.सि 12 –
    1) स्निग्ध, अम्ल, मधुर हृदयानि
    2) अम्ल, लवण,
    3) स्वादु, तिक्त
    4) कषाय, कटु
  - सुश्रुत – मधुरतिक्त → अम्ललवणकटु → अम्लमधुरलवण → मधुरतिक्त → स्निग्ध, रुक्ष
  -
- शोधन व संसर्जन क्रम पश्चात् रतियुक्त, स्थिर इंद्रिय, सत्वसंपन्न इत्यादी कर्म व्यवस्थित असतील तर त्या व्यक्तिला प्रकृतिप्राप्त पुरुष म्हणावे.

- **काश्यप अनुसार 11 दिवसांचे संसर्जन क्रम (का.सू 24)**

| | | |
|---|---|---|
| प्रथम अहनि – सुखोषित जीर्ण भोजन | चतुर्थ – मुद्गमण्ड | अष्टम – तनु जांगल मांसरस |
| द्वितीय – यवागू | पंचम – मुद्गमण्ड + ईषत अम्ल फल | नवम – जांगल मांसरस + अल्प स्नेह |
| तृतीय – दीपनीय विलेपी | षष्ठ, सप्तम – मुद्गमण्ड + स्नेह | दशम, एकादश – मांसरस + ओदन + स्नेह + लवण |

- संसर्जन क्रमाचा उल्लंघन केल्याने होणारे परिणाम
  - ज्वरामकामलापाण्डुकर्णकुष्ठगलामया: | हिक्कातिसारश्वयथु कासाद्या व्यभिचारजाः || - का.सू 24
  - शीत अन्नपान सेवन केल्याने - शूल, अतिसार

- अम्ल द्रव्य, अधिक स्नेह तथा दिवास्वापमुळे - शोथ, उदर, ज्वर

- **एक पंचकर्म झाल्यावर पुढील पंचकर्म कधी करावे ?**

- वमन पश्चात्
  - वमन झाल्यावर 15 दिवसानंतर विरेचन कर्मास सुरुवात करावी. - सुश्रुत / अ.हृ
  - वमन झाल्यावर 15 दिवसानंतर निरुह बस्ति द्यावी – अ.हृ
  - वमन झाल्यावर 16 व्या दिवशी निरुह बस्ति द्यावी – सुश्रुत
  - वमन झाल्यावर 16 व्या दिवशी अनुवासन बस्ति द्यावा – अ.हृ

- विरेचन पश्चात
  - चरक -
    - विरेचन पश्चात् निरुह आणि निरुह पश्चात् विरेचन - 7 वा दिवस संपू पर्यंत करू नये.
    - विरेचन झाल्यावर औषधीपान – 7 व्या दिवसापासून
    - शोधन पश्चात् 9 व्या दिवशी स्नेहपान करावे.
    - विरेचन झाल्यावर 9 व्या दिवशी अनुवासन बस्ति द्यावा
    - पश्चात् तीन दिवस अभ्यंग करुन 12 व्या दिवशी निरुह द्यावा. त्याच दिवशी संध्याकाळी मांसरस भोजन देवून पुन्हा अनुवासन द्यावे.
  - सुश्रुत - विरेचन झाल्यावर 7 व्या दिवशी निरुह बस्ति द्यावा. 7 व्या दिवशीच अनुवासन बस्तिही द्यावा
  - डल्हण - विरेचन झाल्यावर 7 / 8 / 9 व्या दिवशी निरुह बस्ति द्यावा.
  - अ.हृ - विरेचन झाल्यावर 7 व्या दिवशी अनुवासन बस्ति द्यावा.

**General FAQs**

- सम्यक वमन / विरेचन झाले असल्यास पुढील पश्चात कर्मास व संसर्जन क्रमास सुरुवात करावी. आणि हीन् / अतियोग झाला असल्यास त्याची चिकित्सा करावी.
- जर सम्यक विरेचन न झाल्याने रूग्ण मंदाग्निने पीडित असेल पण क्षीण झाला नसेल तर पेया घ्यावी – सुश्रुत
- सम्यक विरेचनचे लक्षण दिसत असतील आणि तरीही विरेचन होत असतील तर शेष औषधी वमन द्वारा बाहेर काढावे. (च.सि 6)
- सम्यक विरेचन पश्चातसुद्धा उद्गार होत असतील तर वमनद्वारे औषधि बाहेर काढावे.
- विरेचन औषधि पक्व झाल्यावर अधिक विरेचन दिल्यास, शीतल ओषधोपचाराने स्तंभन करावे.
- स्नेह अतियोगमध्ये रूक्षविरेचन द्रव्यांनी विरेचन करावे.
- क्रूरकोष्ठी रुग्णामध्ये अल्प विरेचन झाल्यावर लंघन करावे.

- वमनकारक औषधाने जर वमन झाले नाही तर परत वमन द्यावे.
- सम्यक वमनाने जाठराग्नि वृद्धि आणि दोषांचे शमन होते. जर असम्यक लक्षणे दिसत असतील तर प्रथम लंघन करुन औषध पाचन करुन संसर्जन क्रम करावे. (च.सि 6)

- औषध पाचनचे लक्षण – अनुलोमोऽनिलः स्वास्थ्यं क्षुत्तृष्णोर्जो मनस्विता | लघुत्वम् इन्द्रिय, उद्गारशुद्धि जीर्णौषधाकृतिः || - च.सि 6
- औषध न पचल्याचे लक्षण - क्लमो दाहोऽङ्गसदनं भ्रमो मूर्च्छा शिरोरुजा | अरतिर्बलहानिश्च सावशेषौषधाकृतिः || - च.सि 6
- औषध उपद्रवकारी होण्याचे कारण - अकालेऽल्पतिमात्रं च पुराणं न च भावितम् | असम्यक् संस्कृतं चैव व्यापद्येतौषधं दुतम || - च.सि 6

- भोजन जीर्ण झाल्यावरच विरेचन औषधि द्यावे अन्यथा वमन होते - (च.सि.6)
- क्षुधार्त मृदुकोष्ठी अल्पकफमध्ये तीक्ष्ण वमन औषधि दिल्याने विरेचन होते - (च.सि.6)

- पूर्वीचे औषध जीर्ण झाल्यावरच पुन्हा वमन विरेचन हेतु औषधि पान करावे. - (च.सि.6)
- लघु (मृदु) कोष्ठी एवं अल्प बलवान मध्ये मृदु वमन-विरेचन करावे - (च.सि.6)

- स्नेहन स्वेदन शिवाय वमन-विरेचन औषधि प्रयोग केल्यावर उत्पन्न होणारे लक्षण –
  - विभ्रंश, श्वयथु, हिक्का, तमसो दर्शन, भृशम् पिण्डिकोद्वेष्टन, कण्डूमूर्वो: सादं विवर्णताम् (च.सि.6)

- स्नेहन स्वेदन केल्यावरसुद्धा अयोग होण्याचे कारण –
  - अल्पमात्रा औषधि, औषधिचे पाचन होणे, शीतऋतु मध्ये देणे, आमदोष असणे. - (च.सि.6)

- मृदु औषधि indication - दुर्बल शोषित पूर्वमल्पदोषे च मानवम् | अपरिज्ञातकोष्ठं च पाययेतौषधं मृदु || - च.क. 12
- उष्णजल indication - विबद्धेऽल्पे चिराद् दोष स्त्रवतति उष्णं पिबेत जलं, तेनाध्मानं तृषा च्छर्दिर्विबन्धस्यै शाम्यति || - च.क 12
- स्वेद indication - भेषजं न प्रवर्तते ऊर्ध्वं न अधः | सोद्गारं सअंगशूल च स्वेद तत्रावचार्येत || (उर:प्रदेशी स्वेदन) – च.क 12